

# संत श्रीगुलाबराव महाराज परिचय

## परिस्थिती व भूमिका

(आषाढ शु.दशमी ६-७-१८८१ ते वामनद्वादशी २०-९-१९१५)

एकोणिस-विसाव्या शतकांच्या संधिकालात प्रज्ञाचक्षू संत श्रीगुलाबराव महाराजांनी नानाविध विषयांवर विपुल लेखन करूनही त्यांचे मौलिक विचार अजूनपर्यंत महाराष्ट्रातील विद्वानांसमोर व्यवस्थित रीतीने प्रस्तुत झालेले नाहीत. मराठी वाङ्मयीन इतिहासाच्या मोठमोठ्या जंत्री निघाल्या पण त्यात महाराजांच्या विस्तृत आणि मूलगामी विचारांची दखल घेतली गेलेली नाही. उल्लेख केला गेलाच तर २-४ पुस्तकांची नावे देऊन मराठी वाङ्मयाचे इतिहासकार नामानिराळे झाले आहेत.

तसे पाहिले असता प्राचीन मराठी साहित्याच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात संतांच्या भक्ति-काव्यासोबत पंताचे पंडितीवाङ्मय, शाहीरांचे तंतवाङ्मय आणि अर्वाचीन कविता यांचा अभ्यास करण्यात येतो. याचे कारण असे



की प्राचीन वाङ्मयापेक्षा अर्वाचीन कालखंडातील कवितेचे स्वरूप अन्तर्बाह्य बदलले. मुक्तछंदाला सुरुवात झाली इतकेच नव्हे तर काव्याचा आशयही परदेशातून आयात होऊ लागला. त्यामुळे जुन्या नव्याचा संबंध जवळ जवळ तुटला गेला.

अशा परिस्थितीत प्राचीन साहित्याचा विचार करताना महाराजांचे साहित्य विसाव्या शतकातील म्हणून आधुनिक समजले जाते; आणि - अर्वाचीन साहित्याचा विचार करताना महाराज संतपरंपरेतील असल्यामुळे प्राचीन समजून वगळण्यात येते.

महाराजांचे वाङ्मय काव्यदृष्टीने उच्च प्रतीचे आहे. लेखन शैली प्रासादिक आहे. वैचारिक पातळीला तोड नाही. त्यांच्या लेखनात नानाविध विषय आलेले आहेत. त्यातील प्रत्येक विषय युक्तिवादाच्या चौकटीत बंदिस्त आहे. आजच्या बुद्धियुगातील सर्व कसोट्या त्यांच्या वाङ्मयाला लावता येतात. तरी देखील महाराजांचे साहित्य दुर्लक्षित राहिले. महाराजांची ग्रंथरचना, नानाविध विषय हाताळून त्यासंबंधी मूलगामी आणि तौलनिक विवेचन करण्याची हातोटी, विसाव्या शतकात असूनही प्राचीन



परंपरेशी अतूट नाते सांगणारे त्यांचे गद्यपद्यान्वित वाङ्मय व त्यात विखुरलेली विचारसंपदा अभ्यासकांपुढे प्रस्तुत होणे आवश्यक आहे.

महाराजांची नानाविध विषयावर १३९ रचना असूनही विद्वानांनी त्याकडे लक्ष दिले नाही. याचे कारण आणखी एक असण्याचा दाट संभव आहे की आज 'महाराज' या शब्दामागे चमत्कार वगैरे अर्थ चिकटले आहेत त्यामुळे कोण्या 'महाराजांचे' वैचारिक योगदान फार मोठे असू शकते याची कल्पनाच मनाला शिवत नाही.

ज्याप्रमाणे शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, भगवान् गौतम बुद्ध वगैरेंच्या जीवनात चमत्कार असले तरी आज त्यांच्या चमत्कारांकडे जग लक्ष देत नाहीत, उलट त्यांचे विचारधनच लोकांना जाणवते. त्याप्रमाणे महाराजांचे मधुराद्वैताचार्यत्व जगाच्या समोर यावयास हवे. म्हणजे त्यांच्या वैचारिक योगदानाचा योग्य तो सन्मान विचारवंताकडून होऊ शकेल.

### जन्म

विदर्भात अमरावतीपासून तेरा मैलांवर दक्षिणेस लोणीटाकळी या नावाचे एक गांव आहे. हे श्रीगुलाबराव



महाराजांचे आजोळ. येथे माधानाच्या मोहोड कुळातील सौ. अलोकाबाई यांचे उदरी शके १८०३ मधील आषाढ शुद्ध दशमीला (६ जुलै १८८१) महाराजांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नांव गोंदुजी मोहोड. हे माधानचे पाटील. मोहोडांचे घराणे मूळचे मोढ वंशीय क्षत्रिय! पण अनेक पिढ्यांत संस्कारलोप झाल्यामुळे महाराज स्वतःला कुणबीच म्हणवीत.

महाराज पांच महिन्याचे झाल्यावर सौ. अलोकाबाई त्यांना घेऊन माधानाला सासरी परत आल्या. त्यावेळी पाणीदार मोठे डोळे, सरळ नासिका, सावळा वर्ण, पुष्ट व गोंडस हातपाय अशी लोभसवाणी बाळसेदार बालमूर्ती होती. वयाच्या नवव्या महिन्यात डोळे आल्याचे निमित्त झाले आणि कायमचे अंधत्व आले. बाह्य दृष्टी गेली तरी या बालमहात्म्याची चिन्मय दृष्टी सतेज व निर्मळ असल्याने चित्तवृत्ती नेहमीच आनंदी असे. बोलायला येऊ लागल्यापासून मान हलविणे व हाताने टाळ्या वाजविणे यात ही बालमूर्ती रंगू लागली पुढे पुढे हा अल्लडपणा वाढतच चालला. धावणे, चुटक्या वाजवीत गोलगोल फिरणे व मोठ्याने ओरडणे; अशा खेळात त्यांना मौज वाटूं लागली.

### बालपण

महाराज चार वर्षाचे असताना अलोकाबाईना एक मुलगी झाली पण ती वाचली नाही. आईना बाळंतरोगाने ग्रासले आणि इ.स.१८८५ साली त्या निवर्तल्या. महाराज मातृसुखाला पारखे झाले. महाराजांच्या मातुल आजीने- सावित्रीनानीने त्यांना लोणीस नेले व प्रेमाने संगोपन केले. महाराजांनाही आजीचा फार लळा होता. ते तिला 'बाई' म्हणत. तिलाच भातके मागत. भूक तहान तिलाच सांगत. हट्ट आणि सारे लाड तिच्याचपाशी चालत.

बाळपणापासून महाराजांच्या अलौकिकतेचा अनुभव लोकांना येऊ लागला. शेजारच्या स्त्रिया विहीरीवर पाणी भरताना या प्रज्ञाचक्षू मुलाची गंमत पाहण्यासाठी अगदी पाऊलही न वाजविता जवळ येऊन त्या उभ्या राहत. तेव्हा महाराज त्यांची नावे भराभर सांगत. ''आमची नांवे तूं बरोबर कशी रे ओळखलीस?''

असे त्यांनी विचारल्यास ते उत्तर देत ''तुमच्या बांगड्यांच्या आवाजावरून.''

त्यावर त्या विचारीत ''अरे, बांगड्या तर सर्वांच्या सारख्याच आहेत त्यावरून प्रत्येकीचे वेगवेगळे नांव तुला



कसे समजले ?

महाराज - ''प्रत्येकीच्या बांगड्यांचा आवज वेगवेगळा येतो.''

रोज जेवायला बसण्याचे अगोदर चंदनाचे गंध घेऊन बोटाने इकडे तिकडे शिंपडीत. जेवण करीत असता मध्येच दोन्ही हात पुढे करीत. 'असे कां करतोस' म्हणून विचारले असतां सांगत की, ''बाई, एक सुंदर लेकरू आलं होतं. त्याला चार हात, डोक्यावर मुकुट, कपाळास केशरी गंध व कांनात कुंडले होती.''

लहानपणापासून महाराजांना एक छंद होता. दोन्ही हातांनी चुटक्या वाजवीत ते स्वतः भोवती खूप वेळ गरगर फिरत राहत पण त्यांना भोवळ कधी येत नसे.

### शिक्षण

आठव्या वर्षी इ.स.१८९० मध्ये महाराजांच्या वडिलांनी त्यांना माधानला परत आणले. घरात सावत्र आई आली होती. ती महाराजांना बराच त्रास देई. अंधत्वामुळे शाळेत जाऊन शिकण्याचा प्रश्नच नव्हता. पाढे, तोंडी हिशोब वगैरे गावातील पंतोजींनी शिकविले. त्यांचे मोठे काका- पाटीलबोवा त्यांना कधी कधी शाळेत पाठवीत. येवढाच काय तो



शालेय शिक्षणाचा संस्कार!

शास्त्रपुराणांवर त्यांचे फार निष्ठा होती. गावातील उपाध्ये लक्ष्मणभट जोशी यांचेकडे जाऊन श्लोक, शिवलीलामृताचा ११वा अध्याय, व्यंकटेशस्तोत्र वगैरे महाराजांनी पाठ केलीत. एकदा ऐकलेली गोष्ट ते कधी विसरत नसत. त्यांची बुद्धी एकपाठी होती. चावडीवर मुसलमान आला की त्याचेकडून ते कुराणातील कलमे ऐकीत व पुनः अचूक म्हणून दाखवीत.

### विवाह

एकदा ते सहज सीतारामजी भुयार यांच्या शेजारी खेळावयास गेले. तेथे सीतारामजीची आई नातीला घेऊन आली होती ती थट्टेने म्हणाली, ''एका बुक्कीत नारळ फोडशील तर ही पोरगी मी तुला देईन.''

महाराजांनी एका बुक्कीत नारळ फोडला व म्हणाले ''आता पिच्छा पुरवून पोरगी घेईन.''

पुढे याच मुलीशी योग जुळून विवाह झाला याच महाराजांच्या पत्नी मातोश्री सौ. मनकर्णिका! त्यावेळी महाराजांचेवय बारा वर्षाचे होते.



### विद्याव्यासंग

महाराजांना शास्त्रपुराणांची फार आवड होती वयाबरोबर त्यांचे ग्रंथावलोकनही वाढूं लागले. लक्ष्मणभट जोशी, पांडुरंगपंत, केशवराव पांडे वगैरे साक्षर मंडळीजवळून विनीत होऊन मिळतील तेवढे ग्रंथ वाचवून घेत. त्यासाठी काळवेळ, श्रम, द्रव्य यांची त्यांना पर्वा नसे.

वाचनानिमित्त कधी ज्वारी तर कधी गहूं वगैरे गुरुदक्षणा देत. एकदा त्यांनी हातातील चांदीचे कडे काढून दिले तर दुसऱ्या प्रसंगी केशवरावकाकांना स्वतःच्या विवाहात मिळालेली शालमुदीची शाल नेऊन दिली. या ग्रंथावलोकनात वेदवेदान्तापासून संगीत, वैद्यक, साहित्यशास्त्र, थियॉसफी, पाश्चात्य तत्त्वज्ञाने व आधुनिक सायंसमधील इलेक्ट्रॉनिक थियरीपर्यंत त्यांची बुद्धी अकुंठित चालत असे.

### समाधि-योग

लहानपणापासूनच श्रीमहाराज समाधियोगाचा अभ्यास करीत. रात्री सर्वांची नीजानीज झाली की ते कपड्याचा फडत्कार करीत. कोणीही जागे नाही अशी खात्री झाली की डोक्यावर पांघरूण घेत व ध्यानस्थ बसत. असेच

एकदा डोक्यावर पांघरुण घेऊन बसले असता रात्री बाराचे सुमारास भिकाभाऊ जागे झाले.त्यांनी महाराजांकडे पाहिले व ते हांका मारू लागले. स्वाभाविकच महाराज बोलले नाहीत.त्यांनी हाताने चांचपून पाहिले तर श्वासोश्वासही बंद होता. भिकाभाऊंनी घाबरून पाटीलबोवास बोलावून आणले. सर्वत्र गोंधळ माजला. नंतर पहांटे चार वाजता महाराजांची समाधी उतरली व श्वासोच्छ्वास सुरू झाला; तेव्हा सर्वांना हायसे झाले. असे प्रसंग नेहमीचेच असत.

सोळाव्या वर्षी महाराजांचे मातृवत् पालन करणाऱ्या सारजाताई व महाराजांचे वडील महामारीच्या साथीत दगावले.(इस.१८९७) त्यानंतर महाराजांच्या घरातील कौटुंबिक स्वास्थ्य बिघडत चालले.एकदा तर महाराजांना विषप्रयोगाची शंका आली व त्यांनीस्वतःच्या घरचे जेवणच बंद केले. रामचंद्रबापू वगैरे कोणाकडे तरी ते जेवण करीत. अशा या कौटुंबिक कलहाच्या भयानक काळातही त्यांची पारमार्थिक साधना उत्साहाने चालूच होती. अशा उद्वेग आणणाऱ्या संसारापासूनते कमलपत्रावरील जलबिंदु प्रमाणे अलिप्त होते.



## मंत्रदान

त्याच सुमारास देऊरवाड्याच्या नृसिंह मंदिराच्या परिसरात गोपालकाल्याचा उत्सव करणे वगैरे आनंदमय प्रसंगांचीही रेलचेल असे. याच काळात त्यांनी रामचंद्रबापू मोहोड, विश्रामभाऊ, रंगूबाई वगैरे आठदहा मंडळीना प्रथमच मंत्र दिला. यावेळेची त्यांची दिनचर्या साधारणपणे पुढील प्रकारची होती.

## दिनचर्या

महाराज सकाळी थंड पाण्याने स्नान करून गीता, सप्तशती, तुळशीमहात्म्य वगैरे सुरेल आवाजात म्हणत. नंतर मानसपूजा करीत. मानसपूजेचे वेळी बुक्याचा मधुर सुवास दरवळत असे. जेवणापूर्वी तीर्थ घेत. जेवणानंतर कधी कधी प्रहर प्रहर साष्टांग नमस्कार घालून राहत. मान व हात हालविण्याचा प्रकार पूर्ववत् होताच. हात हालवितांना अगदी तल्लीन होऊन जात. कधी जवळच्या खांबाला तर कधी भिंतीला तर कधी स्वतःच्या पाठीलाच त्यांचे हात भडाभड लगत, पण त्यांना त्याची जाणीव नसे. प्रसंगविशेषी वस्त्राचेही भान राहत नसे.

कधी घराजवळच्या कडुनिंबाच्या झाडाच्या खोडावर



धोतर टाकून त्याला देव म्हणून रात्रभर देवाचे पाय चेपीत बसत. त्यावेळी मुखाने काही मंत्र पुटपुटत.

कधी जंगलात जात, स्वतःच्याच धोतराचे जाड काठ फाडून ते झाडाला बांधीत व त्यावर बसून दिवसभर झोके घेत.

केव्हां केव्हां खोलीतच समाधी लावून बसत. त्यावेळी त्यांच्या अंगातून घामाच्या धारा चालत व श्वसोच्छ्वासही बंद राहत असे.

कधी कधी दोन्ही हातांनी चुटक्या वाजवीत स्वतःभोवती गरगर फिरण्याचा त्यांचा खेळही विलक्षण असे. प्रहर प्रहर फिरत राहत.

एखादे वेळी कुत्र्याचा आवाज काढीत म्हणजे गावातील पुष्कळ कुत्री जमा होऊन तीही तशीच ओरडू लागत.

त्याकाळातील महाराजांचा वेष म्हणजे बंडी, टोपी व जाडेभरडे धोतर असा असे.

## पुस्तकांचे प्रेम

महाराजांना पुस्तकांचे फार प्रेम. कोणताही जुना प्राचीन ग्रंथ छापला गेला असो किंवा नवा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा ग्रंथ असो, त्याची माहिती ऐकल्याबरोबर तो



ग्रंथ महाराज बोलावीत. परंतु परिस्थिती अतिशय टंचाईची असल्यामुळे जवळच्या मंडळींना याचना करून ग्रंथांची किंमत चुकती करीत.

पाश्चात्य मतांचे खंडन करताना किंवा आर्य-सिद्धान्तां विषयी माहिती सांगताना त्यांना संदर्भग्रंथांचे अतिशय महत्व वाटत असे. त्यामुळे पुस्तकांची पेटी डोक्यावर घेऊन ते एकटे बेधडक हिंडत. कधी कधी चांदूरबाजार वगैरे परगांवीही एकटेच निघून जात. दिवसां किंवा रात्री हिंडतांना त्यांना कोणाचेही साह्य लागत नसे.

महाराजांचे काका पाटीलबोवा त्यांच्या या लोकविलक्षण वागणुकीने कधी कधी संतापून जात. एकदा रागाच्या भरात ते म्हणाले, ''मला जिंदगी नको. मी आत्ताच घरदार, शेतीवाडी ब्राह्मणांना दान करून टाकतो.''

त्यावेळी महाराज लगेच उठले व ''आत्ताच ब्राह्मणांना बोलावून आणतो'' असे म्हणून घराबाहेर निघाले. ते पाहतांच पाटीलबोवा रागारागाने बाहेर निघून गेले. असे प्रसंग वारंवार येऊ लागले आणि शेवटी इसवी सन १९०० च्या सुमारास घरगुती किटकिटींच्या पराकाष्ठेमुळे महाराजांनी घर सोडले व रामचंद्रबापूंकडे राहूं लागले.

साधारणपणे१९०१ साली त्यांना श्रीज्ञानेश्वर माउलीचा साक्षात् अनुग्रह झाला.

**माझा सद्गुरु करुणाघन । आळंदीपती कल्याण निधान ।**
**जेणे आपुलिया नामचा मंत्र देऊन । कृतार्थ केले मजलागी ।**
**अंकी घेऊनिया खुणा । सांगितल्या स्वनामाच्या ॥**

असे त्या प्रसंगाचे वर्णन महाराजांनी स्वतःच केले आहे.

*खडतर योग*

अशा परमार्थाच्या परमोच्च काळात त्यांची व्यावहारिक गृहपरिस्थिती मात्र अतिशय खडतर होती. पाटीलबोवा मधून मधूनपायली दोन पायली ज्वारी देत. सौ.मनकर्णिका आई इकडून तिकडून तेलमीठ मागून स्वयंपाक करीत. डोक्याला तेल नाही, धड लुगडे नाही की नहाणे माखणे नाही. पण अशा करुण परिस्थितीतही त्यांच्या पतिसेवेत कांही अंतर पडले नाही की कधी त्यांनी त्याविरुद्ध एक अवाक्षर काढले नाही.

काही दिवसांनी महाराज पत्नीसह सिरसगांवात राजाराम देखमुखांकडे राहण्यास गेले, तेथेही महाराजांच्या बाललीला, विद्याव्यासंग, भगवच्चर्चा, अमृतानुभव- ज्ञानेश्वरीचे



निरूपण, कीर्तन, भजन वगैरे रात्रंदिवस चालत असे. त्यांचा सरळ स्वच्छंदी स्वभाव, फुगड्या वगैरेंचा खेळ, स्वकृत नवीन अभंगाची रचना व मधुर आवाजात पदे म्हणणे या सर्व प्रकारांचे लोकांना मोठे कौतुक वाटे व त्यांच्या सहवासातील काळ अप्रतीम आनंदात कसा निघून जाई, याचेही भान लोकांना राहत नसे.

सिरसगांवाहून महाराज मधूनमधूनअमरावतीस येत असत.तेथे मुळे मास्तर, हरिभाऊ केवले वगैरेंचा त्यांचेशी संबंध आला आणि ते महाराजांकडे आकर्षित झाले.त्यावेळी महाराजांनी तौलनिक पद्धतीने वैदिक आणि सांस्कृतिक सिद्धान्तांची मुद्देसूद मांडणी करण्याचे कार्य सुरू केले होते त्यासाठी चर्चा व निबंधलेखन, पत्रलेखन यांचा झपाटा सुरू केला होता.डार्विन-स्पेन्सरादींच्या उत्क्रांतिवादाचे आणि अज्ञयेवादाचे खंडन असलेले ग्वालेरच्या श्री.जठारांना लिहिलेले पत्र याच काळातले!

*सत्यशोधक समाज*

त्याचवेळी ज्योतिबा फुलेंच्या सत्यशोधक समाजाची शाखा सिरसगांवास निघाली होती व त्यात महाराजांना ओढण्याचा प्रयत्न चालू होता. त्यासंबंधी महाराजांनी



आत्मचरित्रात खालील उद्गार काढले आहेत-

''सत्यशोधक म्हणतात की - आम्ही खऱ्या ब्राह्मणांचे विरुद्ध नाही, पण जे मूर्ख आहेत व आपली सुधारणा करीत नाहीत, त्यांनी आपली वेदविद्या शिकावी म्हणून आम्ही प्रयत्न करीत असतो; असे ते म्हणाले म्हणून मी त्यांना सामील झालो. परंतु सिरसगांवातील सभेत सत्यशोधकांनी सरसकट ब्राह्मणांना शिव्या दिल्या. तेव्हा त्या सभेत मी एकटाच उठून- माझ्याशी पूर्वी कबूल केल्याप्रमाणे तुमचे उद्देश नाहीत; असे म्हणून त्यांच्या मतांना खोडून त्यांचेवर प्रश्न टाकले. परंतु त्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली नाहीत. उलट- ''याला ब्राह्मणांनी शिकवून ठेवले आहे, या पोराचे ऐकून आपल्या जातीचे काय पुरे पडणार!'' असे ते दोघे म्हणाले त्यावेळी सर्व मंडळीनी टाळ्या पिटल्या. तेव्हा मोठ्या शहरात जाऊन आपल्या वाणीचा परिणाम दाखविल्याशिवाय लोकांवर वजन पडणार नाही आणि तसे न केल्यास माझे नांव सत्यशोधकात गणले जाईल अशी मला भीति वाटली.''

*(आत्मचरित्र यष्टि १५)*



याप्रमाणे माधानसारखे खेडे सोडून अमरावती शहरात येण्याचे कारण आपल्या आत्मचरित्रात त्यांनी लिहिले आहे. हिंदुसमाजात नव्याने उफाळून येत असलेल्या परस्पर विरोधासंबंधी पक्षपात-विरहित व तौलनिक मूल्यमापन असलेली पत्रे लिहणेतेव्हांपासूनच सुरू झाले. तसेच परकीय मतवाद समजून घेण्यासाठी डार्विन, स्पेन्सर, विल्यम हॅमिल्टन इत्यादींची पुस्तके व भौतिक विज्ञानावरची कोणत्याही भाषेतील पुस्तके वाचून घेण्यासाठी महाराज लोकांची आर्जवे करीत.पुस्तकांचे ओझे डोक्यावर घेऊन पायी अनवाणी दिवसरात्र ऊन पाऊस थंडी यांची पर्वा न करता हिंडत आणि अपार कष्ट सोसत.

*कात्यायनी व्रत*

वयाच्या बाविसाव्या वर्षी इ. स. १९०३ साली त्यांनी माधान येथे भागवतातील दशमस्कंधात वर्णिलेल्या कात्यायनी देवीच्या मंत्राची दीक्षा घेतली व तेथेच नदीच्या काठावर वाळूचा महादेव करून ३३ दिवसांचे कात्यायनीदेवीच्या पूजनाचे व्रत पहिल्यांदा केले. हे व्रत दुसरे वर्षी शुक्लेश्वर वाठोडा येथे झाले.

महाराजांचा नित्याचा वेश

''डोक्यावर काळ्या कुळकुळीत केसांची वेणी,
कपाळास कुंकुमाचा भव्य सौभाग्यतिलक,
गळ्यांत मंगळसूत्र,
स्कंधावर शुभ्र यज्ञोपवीत,
आंगास विभूति,
कमरेस पांढरे स्वच्छ धोतर,
हातांत सुवर्णकंकणे,
पायांत जोडवीं,
अशा वेशाने आपण भगवान् दक्षिणामूर्तीच्या
ध्यानाप्रमाणे आम्हांमध्यें संचार करीत असून,
श्रीकृष्णजन्माष्टमी व कात्यायनी-व्रतोत्सवादि प्रसंगी
माधुर्यदीक्षेनुसार संपूर्ण स्त्रीवेश धारण करीत.''

*(श्री.त्रिपुरवारकृत चरित्र, आवृत्ती-४ पृ. ७-८)*

महाराज स्वतःला ज्ञानेश्वरकन्या म्हणवीत आणि स्वतःला कृष्णपत्नीत्वाचा अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी या महाव्रताचा आरंभ केला.स्वतःला मिळालेली माधुर्यरूपी पराभक्ती आपल्या अनुयायांनाही मिळावी याचीही त्यांना तळमळ असे ते म्हणत -



''गडे हो, आपण सर्व गोपी आहोत अशी भावना करा आणि भागवतात वर्णन केल्याप्रमाणे गोपकुमारींनी कात्यायनी व्रत करून श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार मिळवला तसा आपणही मिळवू या.'' अशा मधुर भावाने हे व्रत त्यांनी सुरू केले. भक्तिपदतीर्थामृतांत ते म्हणतात -

'शिवो भूत्वा शिवं यजेदिति'। ही साह्य नेऊं सखी श्रुती । मग तीसचि प्रार्थनि भक्ती । मागोनि घेऊ ।। प्रेमाचा करू कळस । हरीस अर्पू ब्रह्मरस । श्रीकृष्ण पदी सावकाश । सख्यांनो भृंगी होऊ चला ।। सनकादिकांची ध्येयमूती । नारदप्रभूंची गेय कीर्ती । रासमंडळी प्रेममूर्ती। चला पाहू सख्यांनो ।।''

अशा रीतीने सर्वांना माधुर्य भक्तीच्या परम सात्त्विक आनंदाचा सोहळा दाखविणारा कात्यायनी महोत्सव सुरू झाला.या व्रतातील भजनप्रसंग असो की कृष्णजन्माष्टमीचा सोहळा असो, त्यातील बहार अपूर्व असे. संतवाङ्मयाचे तत्कालीन नांवाजलेले अभ्यासक ह.भ.प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी प्रत्यक्ष पाहून अनुभवलेल्या प्रसंगाचे रेखाटलेले चित्र अप्रतीम आहे.



भजनसोहळा

''कोणीतरी संत तुकारामांचा अभंग किंवा ज्ञानेश्वरीतील ओवी वगैरेंपैकी काही म्हणत.त्यावर महाराज स्वकृत भजन करीत. एक चरण महाराज म्हणत व त्यालगोलग तोच चरण इतर मंडळी म्हणूं लागे. त्याचे पुढचे चरण तत्काल रचूनमहाराज म्हणत. येणेप्रमाणे एकाध तासापासून तीन तीन तासपर्यंत भजनाचा आनंदसोहळा चालत असे.

करुणरसात भजन चालले असता श्रोत्यांचे अंतःकरण करुणेनभरून जाई.

प्रेमयुक्त भजनाचा भाग आला म्हणजे श्रोत्यांचा नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहात.

भक्तिरसाचे वेळी श्रोत्यांचे अंतःकरण भक्तिभावाने थबथबून जाई.

एकूण काय तर ज्या ज्या रसात भजन होई तो तो रस त्या त्या वेळी मूर्तिमंत अवतरत असे आणि मंडळी तन्मय होऊन जाई.

प्रवचन करताना श्रुति- स्मृति- पुराणे- संतवचने जणुं काय आपल्याला केव्हा बोलावतील याची वाटच पहात



असत. त्यांच्या ओघवती वाणीतील ओव्या आणि प्रेमळ अभंग ऐकतानां श्रीज्ञानदेव-एकनाथादि संतांनी त्यांचा अफाट ग्रंथविस्तार कसा केला असेल याची यथार्थ कल्पना डोळ्यापुढे साकार होत असे. ''

त्यांच्या ओघवती वाणीला इतका वेग असे की चारचार जण लिहून घेण्यास बसले तरी जमत नसे. म्हणूनच लिहून घेण्यासाठी मुद्दाम हळू हळू सांगितलेले ग्रंथच तेवढे उपलब्ध आहेत.

परमार्थाचे शिक्षण

श्रीमहाराजांना आपल्या अनुयायी मंडळींची अतिशय काळजी असे. त्यांची परमार्थात प्रगती करण्यासाठी ते फार जपत. त्यांच्या पत्नी सौ. मनकर्णिका यांना लिहिलेले पत्र आणि ताई खोलकुटेंना लिहिलेली योगसाधनेसंबंधीची अकरा पत्रे याची साक्ष देण्यास पुरेशी आहेत.सौ.मनकर्णिका या पतिपरायण पत्नी तर होत्याच पण परमार्थात उत्तम अधिकार असलेल्या शिष्या देखील होत्या.

लोकविलक्षण शिक्षण

महाराजांना एकुलता एक पुत्र होता.तो चार महिन्यांचा असताना मातेच्या मनात, त्या नूतन जन्मलेल्या अर्भका-

विषयी मोह असणे स्वाभाविक होते. परंतु वृत्तिनिरीक्षणदक्ष महाराजांनी या मानसिक स्थितीचा परमार्थावर होणारा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून वाठोडा येथील कात्यायनी व्रताच्या प्रसंगी (डिसेंबर १९०५) एक खोटा व्यूह रचला.

ते रात्री उठलेव मनकर्णिकेस स्वतःच्या हातानेच मुलाला विष देण्यास सांगितले. त्या विलक्षण प्रसंगी माउलीने पुत्रमोह आवरला. मनाची खरी तयारी केली. तेव्हा कुठे महाराजांचे समाधान झाले. पुढे खरा प्रकार समजून आल्यानंतर त्या प्रक्षुब्ध झाल्या व त्यांच्या मुखातून शब्द निघाले - ''चांडाळा, सद्गुरूच्या सेवेत अंतर पाडण्यास तूं माझ्या पोटी कशाला आलास?''

अशा प्रकारच्या लोक विलक्षण शिक्षण पद्धतीने आपल्या सर्व शिष्यमंडळींची पारमार्थिक प्रगती करण्यास महाराज कसोशीने प्रयत्न करीत. असे अनेक प्रसंग त्यांच्या शिष्यमंडळींच्या बाबतीत येत असत. त्यावेळी महाराज किती क्रूर व विकारी आहेत असे मंडळीला वाटणे स्वाभाविक होते परंतु -

**''विकोरोऽपि तेषां श्लाघ्यो भुवनभयभंगव्यसनिनः''**



हे शास्त्रवचन मूर्तिमंत साकार करण्यासाठीच जणुं काय असे प्रसंग महाराज वारंवार घडवून आणीत. ते पारमार्थिक शिक्षणाच्या बाबतीत अतिशय कठोर दिसत असले तरी त्यांच्या मडंळीवर त्यांचेअतिशय प्रेम असे. त्यांच्या अन्तकरणातील जिव्हाळा त्यांच्या मडंळींतील प्रत्येकाला नेहमीच जाणवत असे.

<u>पत्नीविरह</u>

इ. स. १९०७ मध्ये सौ. मनकर्णिकाबाईनी इहलोक सोडला आणि महाराजांनाऐन तारुण्यात पत्नीचा विरह झाला. त्या समयीचे **''पत्नीप्रेमपराग''** नावाचे महाराजांनी रचलेले भावकाव्य रसिकांच्या भावना हेलावून सोडणारे आहे. त्या विरहगाताचा शेवट असा आहे -

**विलासललिते हृद्वनीं । सकंटकहि परि गुलाबफुल पाळी । सौरभ मिळेल तुजचि । जीवन सुकवूनि न पाकळ्या गाळी ॥**

संत साहित्यात जी स्त्रीनिंदा दिसून येते, त्या पार्श्वभूमीवर महाराजांच्या या 'पत्नीप्रेमपराग' काव्याचे स्थान फारच आगळे वेगळे आहे.

तुलना करावयाचीच असल्यास- संस्कृत भाषेतील



महाकवि जगन्नाथ पंडितांच्या 'भामिनी-विलासाला' आणि कविकुलगुरु कालिदासांच्या 'अज-विलापाला' सांसारिक दुःखाची किनार आहे तर महाराजांच्या या विरहगीताला 'मधुराभक्तीचा परतत्त्वस्पर्श' आहे. एका भगवद्भक्त कवीने पत्नीवर लिहिलेले हे विरहगीत एकुलते एक असून संतसाहित्यातील एक सुवर्णपत्रिकाच झाले आहे. परमार्थाचा पूर्ण अधिकार मिळालेली प्रिय पत्नी- प्रिय शिष्या- जेव्हा अर्ध्या वाटेवरून निघून जाते तेव्हा व्याकूळ झालेल्या कविहृदयातील पत्नीप्रेमाच्या परागाचा सुगंध दरवळूं लागतो. तोच काव्यरूपाने साकारला आहे.

या पत्नीवियोगाच्या आघातानंतर महाराजांनी स्वतःच्या आहार विहाराकडे लक्ष देणे सोडून दिले, त्यामुळे त्यांची प्रकृती खालावतच चालली आणि ती पूर्ववत् कधीच झाली नाही.

<u>पार्थिवपूजा</u>

त्यांनी इ. स. १९०८ मधे स्वतः शिवदीक्षा घेऊन नित्य पार्थिवपूजेस आरंभ केला आणि सांप्रदायिकांनाही शिवाच्या पार्थिवपूजनाचा नित्य नियम लावून दिला. हा नाथसंप्रदाय असल्यामुळे गुरुरूपाने भगवान् शंकर आणि उपास्यरूपाने



भगवान् श्रीकृष्ण यांची उपासना सांप्रदायिकांना अनिवार्य केली. यानंतरचा महाराजांचा सर्व काळ भजन, प्रवचन व ग्रंथरचना यातच जात असे.

<u>नवे योगदान</u>

आपल्या सर्व लेखनातून त्यांनी शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाच्या आधारावरच सगुणभक्ति कशी स्थिरावली आहे हेही दाखवून दिले.

* भगवंताचा सगुणसाकार विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे व तो ज्ञानानंतरही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून आद्य शंकराचार्यांच्या अद्वैतात '**अनध्यस्तविवर्त**' या भक्तिसंकल्पनेचे नवे योगदान दिले आणि भक्तीला शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली. शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाला पराभक्तीचा नवा आयाम दिला.

* संतांप्रमाणे भक्तिपर रसाळ अभंगरचना केली आणि कपिल- पतंजलि- व्यास- नारदादि महर्षीप्रमाणे सूत्ररचनाही केली. म्हणून ते **सूत्रकार महर्षि** होते.

* श्रीशंकराचार्यादिकांप्रमाणे खंडनमंडनात्मक भाष्ये लिहिली. म्हणूनते **भाष्यकार** होते.

* संप्रदासुरतरू नावाच्या **आकरग्रंथ** निर्माण केला.

* **संगीत, वैद्यक, व्याकरण, साहित्यशास्त्र** वगैरे अनेक विषयांवर मौलिक लेखन केले.

* सांख्य-योगादि षड्दर्शनांचा वरवर भासणारा विरोध नाहीसा करून त्यांचा परस्पर समन्वय केला आणि सहाही **वैदिक दर्शनांवर नवी ग्रंथरचना** केली.

* परमार्थातील भोंदुगिरीचा परखड शब्दात परिस्फोट केला.

* धर्माचे नूतनीकरण करण्याच्या इच्छेने धर्माच्या अंतरंगात ढवळाढवळ करणाऱ्या आधुनिक धर्मसुधारकांचा खरपूस युक्तिवादाने समाचार घेतला.

* पाश्चात्यांच्या प्रभावाने मांडली गेलेली, आर्यांच्या निवास-स्थानाबद्दलची, लोकमान्य टिळकादिकांची चुकीची ऐतिहासिक मते खोडून काढली आणि अशा अपसमजांमुळे एकात्म भारतीय समाजात उत्पन्न होणारे दुहीचे विषांकुर कसे नष्ट करावे यासंबंधी खऱ्या इतिहासासंबंधी तर्कनिष्ठ, सप्रमाण आणि मूलभूत विचार मांडले. आणि इतिहास-लेखनाची मार्गदर्शक तत्त्वे समर्थपणे सांगितली.

* कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी



**''उत्कर्षबोधक इतिहासच शिकविला पाहिजे''** ही इतिहास-शिक्षणाची मर्यादा दाखवून दिली.

* भारतीयांच्या उज्वल इतिहासाची आणि अक्षुण्ण शिक्षणपरंपरेची ख्रिस्ती इंग्रजांनी बुद्धिपूर्वक केलेली विकृती उघडकीस आणली.

* आर्य हा वंश नाही. आर्य बाहेरून भारतात आले नाहीत. **आर्य म्हणजे सुसंस्कृत मनुष्य** हाच अर्थ आहे. ३००० वर्षापूर्वी सर्व जगात एक वैदिक आर्य संस्कृतीच बहरलेली होती. हे प्राचीन ऐतिहासिक सत्य; अनेक प्रमाणे देऊन नव्याने प्रस्थापित केले.

* भक्ती, वेदान्त, सांख्य, योग़ न्याय, आयुर्वेद, संगीत, साहित्य, नाटक, व्याकरण, कोश़क्रीडा, लिपी वगैरे अनेक विषयांवर- 'सूत्र' आणि 'भाष्य'रचनेपासून 'प्रकरण ग्रंथां'पर्यंत; तसेच ग्रामीण भाषेतील लोकगीतांपासून संप्रदायसुरतरू सारख्या आकर ग्रंथापर्यंत विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती निरनिराळ्या भाषाशैलीत करून त्या त्या शास्त्रात महाराजांनी नवेनवे मौलिक योगदान दिले.

* भौतिकशास्त्रातही प्राचीन आर्य कसे पुढे गेले होते. हे प्राचीन ग्रंथातील संदर्भ देऊन आणि इतिहासाची



प्रमाणे देऊन दाखवून दिले.

* तसेच प्राचीन न्यायदर्शन आणि मुख्यतः वैशेषिकदर्शन यांच्या आधारानेच नवीन वैज्ञानिक शोध कसे लावावेत? याचेही मार्गदर्शनकेले.

* पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या विचारांशी भारतीय तत्त्वज्ञानांची तुलना करून आणि परखड तर्काचा निकष लावून आर्यांचे श्रेष्ठत्व सर्व बाबतीत सिद्ध केले.

अशा प्रकारचे अनेक शास्त्रीय विषय समर्थपणे हाताळले. त्यांच्या १३९ ग्रंथांच्या वाङ्मयात प्राचीन व आधुनिक विषयांची इतकी रेलचेल आहे की साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकरांनी म्हटल्याप्रमाणे -

**'महाराजांचे ग्रंथ म्हणजे**
**एक मोठा एन्सायक्लोपिडिया झाला आहे'.**......

<u>ब्रह्मस्थानी प्रस्थान</u>

हे सर्व जीवनकार्य ऐन तारुण्यात वयाच्या ३४ व्या वर्षी महाराजांनी संपविले. अंतिम प्रस्थानाचे वेळी आळंदीच्या जवळ असावे म्हणून पुणे मुक्कामी शंकरशेठ रोडवरील चाकण ऑइलमिलच्या परिसरात ते राहण्यास गेले. महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांकडून शुद्ध आयुर्वेदीय औषधोपचार



घेतला आणि शेवटी २० सप्टेंबर १९१५ रोजी भाद्रपद शुद्ध वामनद्वादशीला अगदी सूर्योदयाच्या समयी महाराजांनी ब्रह्मस्थानी प्रस्थान केले. ............

एकूण श्रीमहाराजांच्या कार्याचे सिंहावलोकन केले असता असे दिसून येते की, प्राचीन आर्यभारतीय वाङ्मयातूनदडलेले विविध प्रकारचे विचारधन शोधून काढण्याची दिशा दाखविणारे,

भारतीयांच्या नानाविध ज्ञानशाखांत बाह्यतः विरोध दिसला तरी त्यांची एकवाक्यता करणारे,

समन्वयावर भर देऊन भारतीयांच्या अन्तर्गत दुहीला मूठमाती देण्याचे सामर्थ्य असणारे, महाराजांनी निर्मिलेले मौलिक साहित्य हीच महाराजांनी केलेली शारदेची उपासना आहे.

समन्वयाचे सूत्र अनुस्यूत असलेल्या भारतीय ज्ञानक्षेत्रातच नव्हे तर जागतिक विचारविश्वात देखील महाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीने आपले स्वतःचेमहत्वपूर्ण स्थान निश्चितच निर्माण केले आहे.

पूर्वीपासूनजागतिक व्यवस्थेत, केवळ प्रमुख असलेली नव्हे तर नेतृत्व करणारी, सत्त्वसंपन्न भारताची आध्यात्मिक

भूमिका कायम राहण्यासाठी महाराजांच्या कार्याचा पूर्ण हातभार लागणार आहे असे मनात आल्यावाचून राहत नाही.

## महाराजांचे आत्मकथन

श्रीगुलाबराव महाराजांनी स्वतःचा अधिकार, ज्ञानेश्वरांचा साक्षात् अनुग्रह, स्वतःतील आहार्य दोष, ग्रंथरचनेची कारणे व स्वतःच्या जीवनाच्या भूमिका इ. विषयी अनेक ठिकाणी उल्लेख केले आहेत. संप्रदायसुरतरू, सुखवरसुधा, प्रियलीलामहोत्सव, नित्यतीर्थ, साधुबोध, अभंग, पदे, पत्रे, लेख इत्यादी अनेक ठिकाणी नानाविध प्रकारच्या संदर्भातून महाराजांचे मनोगत स्पष्ट झाले आहे. त्यात १५ व्या यष्टीतील १० प्रकरणांचे लहानसे आत्मचरित्रही समाविष्ट आहे. आश्चर्य असे की बरेच ठिकाणी विषय समजावून सांगताना त्यांनी स्वतःच्या दोषांचीच उदाहरणे दिली आहेत. त्यातही गंमत अशी की त्यांच्या नेहमीच्या युक्तिवादाच्या बिनतोड पद्धतीने ते दोष खरोखरीच आहेत असे सिद्ध करण्याची त्यांची लीनता, त्यांच्या भक्तीतील अनन्यदीनताच जणुं साकार करते.

मोठपणा घेऊन केवळ स्वतःसंबंधी लोकांना माहिती



सांगावी, हा हेतू या आत्मचरित्रात मुळीच नाही. उलट त्यांच्या सभोवतालच्या मंडळींची पारमार्थिक उन्नती करण्यासाठी त्यांनी जी काही लोकविलक्षण शिक्षणपद्धती अंगिकारली तिचेच एक अंग म्हणून हे आत्मनिवेदन त्यांनी केलेले आहे. एकूण सर्व दृष्टीने पाहता हे पारमार्थिक आत्मचरित्र अभ्यसनीय झाले आहे.

## श्रीज्ञानेश्वरांचा साक्षात् अनुग्रह

व्यवहारतः पाहिले तर महाराजांना कोणीही शिकविले नाही किंवा शाळेतील शिक्षणाचा संस्कारही झाला नाही. ते म्हणतात -

**'सर्व विद्या ज्ञानेश्वर महाराजांनीच मला दिली'**
**'मला माझ्या ज्ञानेश्वर माउलीने मांडीवर घेतले,**
**कृपाकटाक्षे निहाळिले,**
**माझी पात्रताही पाहिली नाही,**
**पण माउलीला माझी करुणा आली**
**आणि आपल्या स्वनामाचा मंत्र त्यांनी मला दिला.''**

(१९०१ साली)

ज्ञानदेवांनी मंत्र देण्यापूर्वी महाराजांना ऊहबुद्धि या सिद्धीची स्फूर्ति नव्हती त्यामुळे लोकांना विनवणी करून



ते ग्रंथ वाचावयास लावीत होते, असे ते स्वतःबद्दल सांगतात. त्या अनुग्रहानंतर महाराज समर्थ आत्मविश्वासाने म्हणतात -

**''धर्मविचाराच्या ठिकाणी मला केव्हाही कधीही भ्रम उत्पन्न होत नाही. मोठमोठ्या महंत लोकांचेही दोष चटकन दिसू लागतात. कोणाप्रमाणे तर सत्यवतीसुत भगवान् व्यासांप्रमाणे !''**

हे महाराजांचे म्हणणे अगदी खरे आहे कारण कधी ते मधुसूदनसरस्वतींच्या अद्वैतसिद्धीतील विसंगती दाखवितात तर कधी शंकराचार्यांच्या दोन कपिलांचा उल्लेख 'वितंडा' म्हणून ठरवितात. बरे इतके करूनही ते त्यांना दोष देत नाहीत. उलट त्या विरोधी वाटणाऱ्या विसंगतींचा उत्तम समन्वय करून अभ्यासूंच्या पुढे ठेवतात. त्यामुळे महाराजांची बुद्धी किती सूक्ष्म आणि विवेचक होती हे समजून येते. तसेच इतर महात्म्यांच्या विचारातील गुणदोष दाखवूनही त्यांच्यासंबंधी महाराजांची श्रद्धा किंवा आदर यत्किंचितही कमी होत नव्हता, हे पाहून अधिकच आश्चर्य वाटते.

**अगाध माझी मती । येथे विवाद नाही निश्चती ।**



**परी स्वकर्मे चाक्षुष संपत्ती । प्रहरिली आहे ॥** सं. सु. १३५

याप्रमाणे स्वतःच्या ऊहसिद्धीच्या सामर्थ्याची जाणीव आपल्या मंडळीला करून देतात तर दुसऱ्याच वाक्यात ''माझे पूर्वकर्मच वाईट म्हणून मी अंध झालो, शूद्र म्हणून जन्मलो व दारिद्र्याने पीडित आहे.'' असे स्वतःच्या दैवदोषांचे वर्णन करतात. याप्रमाणे महाराजांच्या ठिकाणी आत्मविश्वास आणि दीनता हे परस्पर-विरोधी गुण एकत्र गुण्यागोविंदाने नांदताना आढळतात. एके ठिकाणी म्हणतात-

**''मनुष्यामध्ये मला कोणीही शिकविले नाही. मी लोकांकडून ग्रंथ वाचवून घेतले. माझ्या अचाट बुद्धीमुळे वाचकालाही जो अर्थ समजत नसे तो माझेसमोर सत्यवतिकुमर व्याससम समन्वयपूर्वक साकार होत असे. पुस्तकातील ज्ञान मीच त्यांना सांगत असे. पुढे तेच स्वतःला माझे शिष्य म्हणवून घेऊ लागले. पण त्यांचा मजवरील उपकार न फिटण्याजोगा आहे''** असे कृतज्ञतापूर्वक सांगतात आणि म्हणूनच सांप्रदायिक मंगलाचरणात -

**वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।**
**दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥**

(१)श्री नारायण पैकाजी पंडित (उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज), (२)श्री हरिभाऊ केवले, (३)श्री दत्तात्रेय (भाऊसाहेब) खापरे,(४)श्री व्यंकटराव देशपांडे, (५)श्री.लक्ष्मणराव (नानाजी) कविमंडन.

असा स्वतःच्या शिष्य-पंचायतनाला व वाचक-लेखक वृंदाला नमस्कार करतात आणि आपल्या सांप्रदायिकांनाही हे मंगलाचरण ग्रंथवाचनाचे आधी म्हणण्याचा दंडक घालून देतात. याप्रमाणे स्वतःच्या अगाध बुद्धीची जाणीव असूनही महाराजांची इतरांविषयी असलेली कृतज्ञतेची भावना यत्किंचितही मलीन होत नाही हे विशेष !

महाराजांचे वेदांचे ज्ञान

महाराज विवेचनाच्या ओघात अनेक वेळी वेदातील पुरावे देत, तेव्हा कांहींना तो अधर्म आहे असे वाटे. त्यामुळे महाराजांनी स्वतःच्या वेदोच्चारासंबंधी आदि शंकराचार्य, आनंदगिरी यांची वचने आणि महाभारतातील धर्मव्याध व विदुरांची प्रमाणे देऊन संशयाचे निरसन केले आहे.

शंकराचार्यांनी म्हटले आहे की, ''विदुर- व्याधादिकांना जे वेदज्ञान दृष्टीस पडले ते अध्ययन न करता आपोआप



दृष्टीस पडले. म्हणून त्यांना कोणी दोष देऊ शकत नाही.'' याप्रमाणे महाराजांनी स्वतःच्या वेदोच्चारासंबंधी आर्ष पुरावे देऊन आपले म्हणणे बऱ्याच विस्ताराने मांडले आहे. ते मुळातूनच पहाव. *(ब्रह्मसूत्रभाष्य अ१.पा३.स.३८)*

अनेक भाषांचे ज्ञान

महाराज कोणतीही भाषा कोणाजवळ प्रत्यक्ष शिकल्याचे आढळत नाही.असे असूनही त्यांचा एकपाठीपणा व कोणत्याही भाषेतील शास्त्रात चालणारी अप्रतिहत बुद्धी पाहून लोकांना चमत्कार वाटे.

''योगसाधनेतील 'शब्दावर संयम' केला असता मनुष्याचीच काय पण पशुपक्षांची भाषा देखील समजते'' असे महाराज सांगत. त्यामुळे कोणत्याही भाषेतील प्रश्नाचे मर्म ओळखून महाराज उत्तर देत.

''इंग्रजीच काय पण मराठी देखील मला पोपटपंचीप्रमाणे येत नाही. शिवाय मला अमूक भाषा येते की नाही? त्या कोणी शिकविल्या की आपोआप आल्या? या विषयी लोकांच्या जितक्या विलक्षण समजुती असतील तितक्या खुशाल असोत. मला त्यांच्याशी काही कर्तव्य नाही.'' - असे त्यांनी उद्गार काढले आहेत म्हणून



योगशास्त्रातील शब्द-संयमाचे सूत्रच महाराजांच्या सर्व भाषाज्ञानाला कारण आहे, असे म्हणावे लागते.

योगसाधना

महाराजांनी योगावर ८-१० ग्रंथांची रचना केली. अनेक नवीन प्रक्रिया सांगितल्या. पण स्वतःच्या योगसाधनेबद्दल फारच थोडे उल्लेख केले आहेत. महाराज रात्रभर जालंधरबंध करून निजत असत. ''त्यातील प्राणायामाने समाधि साधली जाते असे विद्यारण्यांचे म्हणणे खरे असल्याचा माझा अनुभव आहे'' अशी कबुली महाराज देतात. एके ठिकाणी स्वतःची नम्रता न सोडता आधुनिक योग्यांना कानपिचकीही देतात - ''महायोगियांपुढे जरी मी लेकरूं आहे तरी अलिकडचे योगी चुकतात असे म्हणण्याला मला काही हरकत वाटत नाही.''

या शब्दात आत्मविश्वास, मोठ्यांपुढे नम्रता आणि विकृतांना दटावणी वगैरे सारेच काही यथायोग्य प्रमाणात त्यांचे ठायी वसत असलेले दिसून येते.

चमत्कारांचा निषेध

महाराजांनी चमत्कारांचा अनेक ठिकाणी निषेध केला आहे. परंतु त्यांच्या चरित्रात मात्र अनेक चमत्कार घडलेले



आहेत असे आढळते. ते सारे चमत्कार साधकाची संसारात अडकलेली बुद्धी मोकळी करण्याकरता व त्याला परमार्थ मार्गावर पुढे चालण्यासाठी उत्साह देण्याकरताच झाले आहेत. महाराजांनी स्वतःच्या चमत्कारांचा एकदोन ठिकाणीच उल्लेख केलेला आहे. हरद्याच्या यमुनाबाई केंकरेंना लिहिलेल्या पत्रात बळवंतरावांना दोन रूपाने दर्शन दिल्याची आठवण करून दिली आहे.

पण तेथेही ''चमत्कारावर दृष्टी देणे उपयोगाचे नाही, कारण चमत्कारात सांपडलेला मनुष्य ब्रह्मवस्तूला सोडून आश्चर्यात वाहत जातो.'' असे स्पष्ट सांगितले.

एकूण कय तर महाराजांच्या ठिकाणी चमत्कार करण्याचे सामर्थ्य असूनही चमत्कारांचा परमार्थात फारसा उपयोग नाही अशी त्यांची ठाम धारणा होती व त्याचेच प्रतिपादनही ते करीत.

आत्मविश्वास व प्रक्रिया प्राविण्य

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महाराजांना स्वतःच्या धार्मिक अधिकारासंबंधी आणि बुद्धीच्या ऊहसामर्थ्याविषयी विलक्षण आत्मविश्वास होता. ते स्वतःबद्दल म्हणतात -

''**धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा,**
**शूद्रवर्णात,**
**सृष्टीमध्ये मी एकटाच आहे,**
**असे तूं पक्के समज.''**

हा त्यांचा आत्मविश्वास आत्मानुभवाच्या आधारावरच होता. त्यांनी केलेले सर्व धर्मांतील व सर्व तत्त्वविचारातील तुलनात्मक खंडनमंडन, विरोधपरिहार आणि समन्वय पाहून तो आत्मविश्वास अनाठायी नव्हता. पण यासोबतच त्यांनी स्वतःकडे घेतलेले लहानपण देखील लक्षणीय आहे. '**लघुत्वाचेनि मुद्दले । बैसला गुरुत्वाचे सेले**' या लघुत्वामुळेच त्यांना गुरुत्वाचा लाभ झाला. हे गुरुत्व देखील समजून उमजून होते. एका पत्रात ते लिहितात -

**''मी शब्दसामर्थ्यात नसलो तरी अर्थज प्रक्रिया रचण्यात आपल्या कृपेने प्रबल आहे. हाच माझ्यातील विशेष आहे. नाथ-तुकारामादिकांतही शब्दसामर्थ्यापेक्षा हाच 'विशेष' होता. म्हणूनच मला जगातील कोणत्याही पंडिताची आपल्या कृपेने भीती वाटत नाही.''**

श्रीमहाराजांच्या चरित्रातील अनेक प्रसंगांवरून आणि विद्वन्मान्य ग्रंथातील मर्मावर बोट ठेवण्याच्या पद्धतीवरून



हा ''विशेष'' प्रकर्षाने जाणवतो. त्याचप्रमाणे त्यांनी योग, ज्ञान व भक्ती यात नवीन प्रक्रिया रचून आपल्या अनुयायांची परमार्थात सुधारणा करण्याचा आजीवन प्रयत्न केला. या प्रक्रिया नवीन असूनही जुन्याला अविरोधी आहेत, हे मात्र लक्षात ठेवण्याजोगे आहे. हे प्रक्रियाप्रावीण्य महाराजांचे अंगी जाणीवपूर्वक होते, हेच या पत्रातून व्यक्त होते.

## <u>मोठेपणाचे भय</u>

स्वतःचे दोष उघड करून सांगण्यास फार मोठे धैर्य लागते ते महाराजांच्या ठिकाणी पूर्णरूपाने दिसून येते. वाचस्पतीप्रमाणे बुद्धी असूनही मोठेपणाचे त्यांना भय वाटते. त्यांचे ठिकाणी असलेले गुण कोणी वर्णन करू लागले तर व्याधाच्या तावडीत सापडलेल्या हरणाप्रमाणे त्यांचे मन गजबजून जाते. पण असे असूनही- स्वधर्मी थोरू । अवसरी उदारू ।। आत्मचर्चे चतुरू । एऱ्हवी वेडू ।। धर्मजिज्ञासा पूर्ण करण्यात आणि आत्मचर्चेत महाराजांचा कोणी हात धरू शकत नसे, परंतु मान दिला असता ते अतिशय कासावीस होत, हे त्यांच्या अभंगादि काव्यातून जाणवते -

''मिष्ठान्नावाचून एक दिवस निभत नाही. क्रोधाविण



चित्त ओस आहे, असेही कधी होत नाही. दुसऱ्याचे गुणदोष मुखात घंटेसारखे नाद करीत असतात. लोकांना मात्र मी भोळाभाव दाखवितो.

तरी हे भगवंता माझे सत्त्व पाहूं नकोस. गुण पहायला जाशील तर माझे दोषच दिसतील. म्हणून दोष न पाहता केवळ कृपा कर.

विप्र माझी सेवा करतात. एकादशीचे दिवशी ब्राह्मण मला खडावा आणून देतात. असे दारुण प्रारब्ध ओढवले आहे.

हे श्रीकृष्णा, तुमची कामिनी म्हणविण्याची मला लाज वाटतेकारण मनात स्वामिनी होण्याची इच्छा आहे. ऊन-तहान मी सहन केले नाही. तप केले नाही तरी बिनाकष्टाचे मी फळ मागते. पण तिकडे लक्ष न देतां तूं कृपा कर.'' अशी त्यांनी देवापाशी करुणा भाकली आहे.

इतर लोकांना पत्रे लिहिताना त्यांनी स्वतःचे मन मोकळे केले आहे. देवासच्या तुकोजी राजे पवार यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात -

''माझी विद्या थोर आहे हे सांगून तुम्हाला कोणी तरी फसविले आहे. ज्ञानेश्वरीशिवाय मला काही येत नाही.



मी चमत्कार करून तुम्हाला रिझवूं शकत नाही. बोलतो तेवढा मी विरक्त नाही. कवित्व करतो ते मानासाठी. तुमच्या घरी माझा मान झाला तर माझे मन चौखूर उधळेल, याचीच मला भीती वाटते.''

श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी महाराजांवर आरोप केले होते की ''ते कुणबी असून वेदांचा उच्चार करतात आणि पुरुष असून स्त्रीवेष घेतात'' - यासंबंधी 'शास्त्रामानाने मी खरोखरच दोषी आहे, पण हे व्यसन आता सुटूं शकत नाही.'' असे म्हणूनमहाराजांनी निस्संकोचपणे या आरोपांचा स्वीकार केला आहे. इतकेच नव्हे तर वैजयंतीमाला या स्तोत्रात श्रीवासुदेवानंद सरस्वतींची, विवेकानंदांची, रामकृष्णपरमहंसांची स्तुती देखील केली आहे.

## <u>पूर्वकर्म वाईट</u>

परमेश्वर अतीव दयाळू आहे याचा महाराज स्वतःचाच अनुभव सांगतात - ''मी शूद्र आहे, आंधळा आहे, असे माझे प्रारब्ध आहे. ब्राह्मणांचे हातून सेवा घेणे हे सर्वास ठाऊक आहे. तेव्हा मला इतके जबरदस्त ऊहसामर्थ्य जे आले ती परमेश्वराची दयाच नव्हे काय?'' याप्रमाणे पूर्वीच्या पापकर्मामुळे अंधत्व आले आहेअसे महाराजांनी

अनेकदा सांगितले आहे. स्वतःचे दोष उघड करून ''बहुतेक लोक माझ्यापेक्षा चांगले आहेत'' असे ते छातीला हात लावून म्हणतात.

शिक्षणपद्धती

स्वतःबद्दल महाराजांची भावना अगदी स्वस्मिन् दीनतेची असली तरी स्वतःच्या अनुयायी मंडळीच्या उन्नतीबाबत प्रयत्न करताना मात्र त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास व्यक्त होई. त्यामुळे साधकांना पारमार्थाच्या वाटचालीत महाराजांचे भरभक्कम आश्वासन सोबत असे. महाराजांचा प्रेमळपणा त्यांच्या पत्रांमध्ये अतिशय उत्कटतेने व्यक्त झाला आहे. मंडळींची उन्नती होण्यासाठी महाराज वाटेल ते परिश्रम करण्यास तयार असत. मातोश्री ताई खोलकुटे यांना लिहिलेल्या पत्रात ते तिला आश्वासन देताना म्हणतात.

**''नरकात येऊन मी तुझा उद्धार करीन, किंवा तुझ्या पोटी पुनः जन्म घेऊन तुला परमेश्वरप्राप्ती करून देईन.''**

अशा उत्कट वात्सल्याने ओतप्रत भरलेले शिष्यप्रेम व्यक्त झालेले आहे.



प्रेमळपणा

ताईंना लिहिलेली योगसाधनेची ११ पत्रे महाराजांची शिक्षणपद्धती कशी होती ते दाखवून देणारी आहेत. योगाभ्यासाची प्रक्रिया, विघ्न निवारण्याचे उपाय वगैरे सविस्तर सांगितले आहेत. ताईची भीती दूर करण्यासाठी-

''मला पुनर्जन्माची भीती नाही. त्यात तुझ्या सारख्या निर्मळ रत्नाच्या उदरी माझा जन्म झाला तर मी खराच भाग्यवान! मजकडून काय अपराध झाला म्हणून त्वां उत्तर पाठविले नाहीस?

तुझा प्रेमळ पत्रलेख । वाचूनि हारपले सर्व दुःख ॥ वाटे जणू ब्रह्मसुख । जवळी आले ॥ तुझी वाक्यवृत्ती मधुरा । ऐकून सुटल्या विमलांबुधारा ॥

असा प्रेमळपणा शब्दाशब्दातून पाझरताना दिसेल. पण इतका उपदेश केल्यानंतर शेवटी गीतेत म्हटल्याप्रमाणे ''तुला आवडेल तर कर नाहीत तर सोडून दे'' असेच ते म्हणतात. या पत्रांमध्ये आईचे वात्सल्य, पित्याचे आश्वासन आणि मैत्रिणीचे गुज सारे काही एकवटले आहे.



लोण्याहूनि मऊ, वज्राहूनि कठोर

श्री मुळेमास्तर आणि श्रीनिवासशास्त्री हरदासांना महाराज लिहितात **''तुम्ही मला धुळीतून बाहेर काढले आहे. हे मी कधी विसरणार नाही''** अशी कृतज्ञता बाळगतात, परंतु प्रसंगविशेषी त्यांची चांगली कान उघाडणीही ते करतात -

मज पायी लोळवावे । अथवा तुम्ही शरण यावे ।
कोणेही प्रकारे करावे । बरवेपणा आपुले ॥

तुम्ही आम्ही एकच आहोत. म्हणून धीट वचन बोलतो. मला आपले लेकरू समजा आणि कृपाकरून डोळे उघडा. **''आत्मसार्थक करणाऱ्या पुरुषांना किंचित् कारणाकरता, आम्ही आपल्या हातचे सोडीत नसतो.''**

असे जन्मजन्मान्तरीचे आश्वासन महाराजांनी दिले आहे.

'विश्वरूप दाखवीन'

''तुम्हाला लयचिंतनाची प्रक्रिया सांगितली आहे. तिची पूर्ण प्राप्ती करून देण्याची जबाबदारी माझी आहे. तुम्हाला खरे वाटो की खोटे वाटो मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करीन. मी तुम्हाला गीतेप्रमाणे विश्वरूप दर्शन दाखवीन पण आधी मी



सांगेन त्याप्रमाणे तुम्ही केले पाहिजे. हे एकाच जन्मात सहज साधू शकाल पण तुम्ही धैर्यपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक वैराग्यसंपत्ती आंगी आणाल काय ते सांगावे म्हणजे पुढील उपाय सांगतो''

याप्रमणे विश्वरूप दाखविण्याचे आश्वासन महाराज देतात. पण त्यासाठी वैराग्यबळ अंगी येण्यासाठी कानउघाडणीही करतात -

कान उघाडणी

''तुम्ही मला खरोखरच प्रेमरज्जूने बांधले तर मला एक पाऊलही पुढे निघवणार नाही असे मी ज्ञानेश्वरसाक्ष सांगतो.''

**''परंतु माझ्या सर्वज्ञत्वाबद्दल जसा सर्वांचा निश्चय आहे, तसा माझ्या सर्वशक्तिमत्वाबद्दल दिसत नाही.''**

''इतके लोटांगण घालून सांगितले असताही जर तुमचे चित्त द्रवत नाही तर तुमचे म्हणणे काय ते तरी सांगा. मला केवळ अन्नाकरताच तुम्हाला असे सांगणे आहे असे नाही; कारण श्वान जसे उदर भरतात तसे आम्हीही भरतो. याउपरही तुम्हाला स्वहिताची जर काळजी नसेल तर मी काय आपला मेंदू काढून तुमचे हाती द्यावा? मी

तुमचे फुकट दास्य करण्यास तयार असूनही जर तुम्हाला करवून घेता येत नसेल तर तुमचे प्रारब्ध! पण असे प्रारब्धावर बोल देऊन बसण्यापेक्षा श्वान-सूकरादि जन्म झाले असे तर बरे होते. कारण पाषाणादि प्राणी जड खरे परंतु स्वस्थानी क्षणभर तरी विश्रांती घेतात. पण तुम्ही आम्ही तर- दिवसा लोकांचे दास व रात्री स्त्रियांचे पास- अशा रीतीने विश्रांतीपासून च्युत झालेले आहोत.

तुम्ही आपले हित करीत असताना माझ्यावर कितीही जरी क्रोधाग्नीचे शब्द टाकले तरी मी शिरसावंद्य मानीन. परंतु स्वहिताकडे लक्ष न देता स्मशानवैराग्यजलाने डोळे भरून, 'वाहवा, वाहवा' म्हणणे मला पसंत नाही. हे तात, **आपण जितका जितका विश्वास मजवर ठेवाल तितक्या या जन्मात व पुढच्या जन्मात आपणास अनंत प्रचिती येतील.''**

*अंधपरंपरा*

आता आपणास वाटेल की आम्ही अंधविश्वास ठेवावा की काय? तर बाबा, तुम्हाला डोळेच नाहीत म्हणूनच तुम्हाला अंधविश्वास ठेवावा लागतो. आंधळ्याने जर डोळसाचा हात धरून मग त्याच्याविषयी भलभलत्या कल्पना केल्या



तर काय फळ मिळेल?

* तुम्ही परमार्थाविषयी आंधळे.
* मी जगाविषयी आंधळा.
* ज्ञानेश्वरमहाराज समाधीत डोळे लावून बसलेले.
* भगवान शंकर स्मशानात डोळे लावून आहेत.
* श्रीकृष्ण गोपीने गुलाल टाकल्यामुळे रासात डोळे लावीत आहेत.
* अशी ही अंधपरंपराच तुम्हां आम्हाच्या सुखाला कारणीभूत होणार आहे.''

याप्रमाणे मंडळींच्या मनोवृत्तीनुसार प्रसंगी लीनता, प्रसंगी प्रेम, तर प्रसंगी कानउघडणी वगैरे उपदेशाच्या विविध पद्धतींनी महाराजांनी आपल्या मडंळीची सत्त्ववृद्धी केली.

*शिष्यांना नमन*

परंतु अंध असल्यामुळे शिष्यांकडून लेखन-वाचनापासून जोडे आणण्यापर्यंत सर्व प्रकारची सेवा करवून घेण्याचा त्यांचेवर प्रसंग येई. त्यामुळे महाराजांना अतिशय संकोच वाटत असे. जणुं त्यामुळेच की काय शिष्यासंबंधी वाटणाऱ्या कृतज्ञतेला त्यांनी मंगलाचरणात स्थान दिले. इतकेच



नव्हे तर -

शिष्य-पंचातनाला आणि लेखक-वाचकवृदांला नमन न करता धार्मिक वा सांप्रदायिक कार्य आरंभ करणाऱ्याला संप्रदायबहिर्भूत होण्याचा शाप दिला.

वाचकं लेखकं वंदे गुरुं नारयणं हरिम् ।<br>
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥

याच शिष्यप्रेमातून श्रीज्ञानेश्वरमाउलीला विनवणी केली आहे -

''मी अतिशय पतित आहे. माझा उद्धार उशीरा करा, पण ज्यांनी माझेवर भरवंसा ठेवला आहे त्यांचा उद्धार माझ्या आधी करा. माझ्या शिरावर त्यांचे ओझे आहे. ते आपल्या प्रतापाने तुम्ही उचलून घ्या. म्हणजे माझ्या प्रतिज्ञेचा भंग होणार नाही. माझी एवढी एक इच्छा, हे ज्ञानेश्वरमाउली तूं पूर्ण कर.

**परि जया वाटे माझाचि आधार ।**(३०)<br>
**तयांचा उद्धार तुम्ही कीजे ॥**<br>
**आपुल्या प्रतापें उचलोनी ओझे ।**<br>
**माझे आधी कीजे भवज्जन ॥**<br>
**न करितां माझ्या प्रतिज्ञेचा भंग ।**



**वासना तरंग निवारी हे ॥अभंग.६११॥**

*विद्या आणि ग्रंथनिर्मिती*

चर्चेतून आणि ग्रंथातून युक्तीने पटवून देण्याचा महाराजांचा बाणा होता. आजच्या बुद्धियुगात अनुभवाला युक्तीची जोड देणे आवश्यक होते म्हणूनच महाराजांनी स्वानुभवाला युक्तिवादाच्या चौकटीत बसवून सर्व वाङ्मयनिर्मिती केली. त्यांनी मुळेमास्तरांना एका पत्रात स्वतःच्या विद्येची मर्यादा सांगितली आहे.

माझी विद्या किती आहे, हे मी सर्वास जाहीर करतो-

* वेदांवर पूज्यबुद्धी मात्र !
* गीता, महाभारत, भागवत, योगवासिष्ठ, वाल्मिकी रामायण या ग्रंथांचे होईल तेवढे श्रवण व अवलोकन;
* ज्ञानेश्वरी, एकनाथीभागवत, तुकारामगाथा, तुलसीरामायण या ग्रंथांचे पठन;

येवढीच माझी विद्या आहे. यांच्या पलीकडे मला काही येत नाही, हे मी डिमडिम् पिटून सांगतो.

असा नम्रपणा असला तरी त्यांची सवाशेच्यावर असलेली विविध विषयांवरची ग्रंथरचना सामान्य बुद्धीच्या

आवाक्यात येण्यासारखी नाही. हा ग्रंथरचनेचा खटाटोप कां केला? या प्रश्नाला त्यांनी भवभूतीचेच उत्तर पुनः दिले आहे.

''जे कोणी आमचा अपमान करीत असतील त्यांच्याकरता हा आमचा यत्न नाही. माझ्यासारखेच अन्तःकरण असलेल्यासाठी हा सर्व खटाटोप आहे.

अनंत कालात केव्हांतरी आणि विपुल पृथ्वीवर कोठेतरी, माझे विचार आवडतील असा कोणीतरी भेटेलच. त्याचेसाठीच हे ग्रंथ मी रचले आहेत.''

परखड उत्तर

''आपण इतके स्पष्ट लिहिता यावरून लोक आपणावर टीका करतील ना?'' या आक्षेपावर ते उत्तरतात -

**१-** वत्सा, मूर्ख लोकांच्या मनाला रुचण्याइतके माझे भाषण हलकट नसते. मूर्ख लोकांकडून टीका ऐकली नाही तर आजच्या भाषणात हलकटपणा झाला आहे, असे मला खात्रीने वाटते.

**२-** सदाचारी विद्वान लोकांकडून मला भिण्याचे कारण नाही. त्यांचेकडून मला माझी सुधारणाच करून घ्यावयाची आहे.



**३-** दुराचारी विद्वान वर्गाच्या हातून मात्र माझा लेख डोळ्यानेही पाहणे होणार नाही, मग 'ब्र' काढण्याची छाती कोठली?

**४-** शिवाय ब्रह्मविद्येवाचून सर्व विद्या आचारवर्जित असतील तर मी त्या सर्वांवर थुंकणारा आहे.

**५-** आणि व्यवहारविद्येचे मिश्रण झाल्यावाचून नुसत्या ब्रह्मविद्येने कोणावर टीका करता यायची नाही, म्हणून मी सर्वथा निर्भय आहे.

अनेक भाषाशैलीतून लेखन

आधुनिक विद्वानांच्या अभ्यासपद्धतीत भाषा-भिन्नत्वाने लेखकभिन्नत्व मानले जाते. एकदा शिवगंगा मठाधिपती शंकराचार्यांनी ''विद्यारण्यांची भाषा दिसत नाही म्हणून अमुक ग्रंथ विद्यारण्यांचा नव्हे'' असे म्हटले होते. त्यावर महाराजांनी स्वतःचेच उदाहरण देऊन समर्पक उत्तर दिले आहे.

''एकच पुरुष अनेक प्रकारच्या भाषा लिहूं शकतो. हे माझ्यासारख्या अल्पमती मनुष्याच्या ग्रंथावरून देखील दिसून येते.''

या महाराजांच्या म्हणण्यात अवास्तवता मुळीच नाही.



निगमांतपथसंदीपक, प्रेमनिकुंज, संस्कृतातील सूत्ररचना, भक्तिभाष्य, तुबंडी, बाराखडी, स्त्रीगीते, मणिमंजुषा, वऱ्हाडीभाषातील रुक्मिणीस्वंयवर वगैरे विविध रचना अगदी परस्पर भिन्न शैलीत झालेल्या आहेत. नव्या दृष्टीनुसार पाहिले तर या ग्रंथांचे ग्रंथकार निरनिराळे मानावे लागतील. पण सर्व रचना महाराजांची एकट्या स्वतःचीच आहे. म्हणून आधुनिक विद्वानांनी गृहीत धरलेला ''भाषाभिन्नत्वावरून लेखकभिन्नत्वाचा सिद्धान्त'' आत्मानुभवी संत सत्पुरुषांच्या बाबतीत लावणे योग्य ठरत नाही, असे महाराजांनी जणुं स्वतःच्याच उदाहरणावरून सिद्ध करून दिले आहे.

स्वतःच्या ग्रंथांचे प्रामाण्य

महाराजांनी स्वतःच आपल्या ग्रंथांचे प्रामाण्य कसे ठरवावे, तेही सुखवरसुधेत (य१३) सांगितले आहे. त्यांच्या दृष्टीने त्यांची स्वतःची सर्व ग्रंथनिर्मिती श्रीज्ञानेश्वरांच्या ग्रंथावर भाष्य म्हणून आहे, स्वतंत्र नाही. परंतु त्यांनी स्वतःच्या ग्रंथांना दिलेलेगौणत्व महाराजांच्या उपसनेला आणि नम्रतेला साजेसे असले तरी ती केवळ निरहंकारता आहे. जसे गीतेवरील भाष्य म्हणून ज्ञानेश्वरी असली तरी



तिला गौणत्व येत नाही तसेच महाराजांच्या ग्रंथांचे स्वतंत्रत्व आणि महत्व तिळमात्र कमी होत नाही असेच अभ्यासूंना दिसून येईल.

तसेच स्वतःचे कोणते ग्रंथ ''पूर्ण प्रमाण'' मानावे व कोणते ''समयानुसार'' मानावे व कोणते ''अप्रमाण'' समजावे याचे सुखवरसुधेतील विवेचन लक्षात घेवून महाराजांचे विचार समजून घेणे फार अगत्याचे आहे.

गैरसमजुती व प्रतिकार

महाराजांचे आत्मचरित्र आणि मुमुक्षू मासिकातील ता. १९-११-१९१४ चे पत्र या दोन ठिकाणी महाराजांनी त्यांचेबद्दल असलेल्या लोकांच्या काही गैरसमजुतींना उत्तर दिले आहे. पत्रात ते सुरवातीलाच म्हणतात -

स्वतःची महती गाणे, सज्जन मंडळीत वाईट असले तरी ''अधर्माला प्रतिबंध करण्यासाठी स्वतःची महती गावी.'' या वसिष्ठवचनाचा आधार घेऊन आजपावेतो न काढलेले उद्‌गार आज काढणे भाग पडत आहे.''

१- महाराज स्वतःला क्षत्रिय लिहितात.

२- ब्राह्मण ग्रंथ लिहितात व महाराजांना पुढे करून त्यांचे नाव घालतात.

३- मंडळी वाचून दाखवितात व त्यावरून महाराज इकडचे तिकडचे लिहितात.

४- शौच्याचे वेळी ग्रंथ वाचतात याचा अर्थ काहीतरी यक्षिणीसाधन केले असले पाहिजे.

५- ब्रह्मचर्याला पुष्टी देत नाहीत.

६- स्वतःला शूद्र (कुणबी) म्हणवितात तर त्यांच्या मुलाला मुलगी मिळणार नाही.

या सर्व गैरसमजुतीचा परिहार महाराजांनी केला आहे. शवेटी तर त्यांचे वाक्य असे आहे की,

**''परिस्थितीने बलेकरून मला अधर्मात ओढून नेले तरी,मी तोंडाने धर्म सुचवून मरेन, हा माझा निश्चय आहे.''**

आत्मचरित्रात[य१५] त्यांनी स्वतःसंबंधी विपरीत दोषाभास कसे उत्पन्न झाले व त्यामुळे जवळच्या मंडळीवर त्याचा कसा विवरीत परिणाम झाला हे सांगितले आहे.

''माधानला असताना मला पैशाची गरज नव्हती पण अमरावतीला आल्यावर वाचक आणि लेखक सतत जवळ राहू लागल्यामुहे त्यांच्या खाण्यापिण्यासाठी, ग्रंथ विकत घेण्यासाठी आणि व्रतादिकांसाठी पैशाची जरूरी



पडूं लागली तेव्हा थोड्याशा असत्याभासरूपी वाणीचा आश्रय करणे भाग पडले म्हणून एकीकडे उन्नतीला तर दुसरीकडे अवनतीला प्रारंभ झाला.''

अशाप्रकारे महाराजांनी अनेक ठिकाणी प्रांजळपणे आत्मकथन केले आहे.त्यावरून त्यांच्या आत्मनिरीक्षणाचा शोध घेता येईल. या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास खऱ्या आत्मानुभवी सत्पुरुषांच्या अन्तःकरणाच्या कोमलतेची आणि कठोर आत्मनिरीक्षण करण्याच्या पद्धतीची थोडीफार कल्पना येऊ शकेल. लोकांच्या उद्धारासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न सत्पुरुष सतत करीत असतात. त्यासाठी निंदा, अपमान वगैरे सहन करताना त्यांना त्याचे काहीच वाटत नाही. तसेच त्यांचे वरवर दिसणारे दोष देखील अनुयायी मंडळीला शिक्षण देण्यासाठी उसने आणलेले म्हणजे ''आहार्य'' असतात असेही शास्त्रीय दृष्ट्या लक्षात येते.

### पूर्वीच्या संतांच्या काळची परिस्थिती

पूर्वीच्या संतांच्या काळची परिस्थिती विसाव्या शतकापेक्षा अगदी भिन्न होती. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनंतर मुसलमानी आक्रमणामुळे साऱ्या महाराष्ट्रात अस्थिर वातावरण उत्पन्न झाले. घरदार सुरक्षित नव्हते की



आयाबहिणींची अब्रू सुरक्षित नव्हती. रामदासांची वेळी तर स्नानसंध्या करण्यासाठी शुद्ध पाणीही मिळणे कठीण होते, सारे यवनांनी विटाळलेले होते.अशी अतिशय अवघड परिस्थिती असूनही समाजाची सांस्कृतिक स्थिती मात्र चांगली होती. मुसलमान आक्रमक आणि जेते होते म्हणून त्यांच्या भाषेचा प्रभाव मराठीवर पडला परंतु संस्कृतीचा प्रभाव फारसा पडला नाही.मुसलमानी आक्रमण पाशवी आणि असंस्कृत होते. त्यांनी बाह्यतः राजकारणात विजय मिळविला खरा परंतु भरताच्या शिक्षणादि सांस्कृतिक क्षेत्रात मात्र जुन्या भारतीय परंपरेप्रमाणेच ज्ञानदानाची परंपरा चालू राहिली. नवी पिढी संस्कृतपाठशालातून शास्त्राभ्यासाची संथा घेत असे. इतर समाजावर कथा, कीर्तन, पुराण, प्रवचन यातून सुसंस्कार घडत असत. कीर्तन पुराणादिकांतून चांगले कोणते व वाईट कोणते ? धर्म कोणता व अधर्म कोणता ? नीती कोणती व अनीती कोणती? याचे बाळकडू लहानपणापासून मिळत असे. सुशिक्षितांमध्ये शास्त्राभ्यासामुळे संस्कृतीचा अभिमान वाढीस लागत असे, तर सर्व समाजात गुणांची कदर करण्याची योग्यता अंगी येत असे. त्यामुळे सर्व समाजात सत्वसंपन्नता



अधिक प्रमाणात होती. अशा परिस्थितीत श्रीएकनाथ, श्रीतुकारामादी संतांनी समाजातील सर्व थरातील व्यक्तींची पारमार्थिक प्रगती व्हावी यासाठी भक्तिप्रेमाची सगुण भक्ती वाढविली. त्यांना शास्त्रीय पद्धतीची मीमांसा करण्याचे फारसे कारणच पडले नाही. वामन पंडितांसारखे विद्वान देखील भक्तीला शिरसावंद्य मानीत. निर्गुणसगुणाची योग्यता सारखीच समजली जात असे.त्यामुळे संतांनासगुणभक्तीची शास्त्रीयपद्धतीने मुद्दाम मांडणी करण्याची आवश्यकता वाटली नाही. **''निर्गुणाहूनी सगुण न्यून। मानी तो महामूर्ख जाण''** वगैरे सिद्धान्त भागवत रामायणादिकांत नाथांनी स्पष्टपणे मांडलेच आहेत.त्यांच्या काळात निर्गुणाचा फारसा ''उदो उदो'' होत नव्हता म्हणून भक्तीच्या शास्त्रीय मांडणीवर संतांनी जोर दिलेला नाही.

एकनाथांनी मुसलमानांच्या बाह्य व पाशवी आक्रमणामुळे गलितधैर्य झालेल्या समाजाला रामायण सांगितले. भगवान् रामचंद्राची शौर्यगाथा गावून देशभक्तिप्रवण केले. त्यातूनच पुढे समर्थ रामदास स्वामी व छत्रपती शिवाजीराजांसारखी नररत्ने समाजमंथनातून उदयाला आलीत. इस्लामी आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे धैर्य समाजाच्या अंगी

आले आणि हिंदवी स्वराज्य स्थापन झाले.समर्थ रामदासांनी रामभक्तीची रुजवात केली. बलोपासनेसाठी हनुमानाची सर्वदूर स्थापना केली आणि हरिकीर्तनाबरोबरच देशभक्तिपूर्ण राजकारणाचेही धडे समाजाला दिले. परंतु या सर्व सामाजिक परिस्थितीत परकीयांचे बाह्य आक्रमण दूर करण्याचाच प्रयत्न प्रामुख्याने झाला. त्यावेळी संस्कारसंपन्न समाजाची वैदिक व पौराणिक श्रद्धास्थाने कायम होती. त्यामुळे मुद्दाम सांख्य योग न्याय संगीत आयुर्वेद वगैरे जुन्या आर्यशास्त्रांवर ग्रंथरचना करण्याचे प्रयोजनच नव्हते.

त्यांच्या काळात भक्तीच्या क्षेत्रात भोंदूगिरीने डोके वर काढले होते. लोक चमत्कारालाच अध्यात्म समजू लागले होते. त्यामुळे श्रीतुकाराम एकनाथादि संतांनी भोंदू साधूंवर चांगलेच फटकारे ओढले आहेत.

तोंवरी तोंवरी माळांचे भूषण ।<br>
जों तुकयाचे दर्शन झाले नाही ॥

अशा आत्मविश्वासाने संत तुकारामांसारख्यांनी परमार्थातील वाटमाऱ्यांचा मुखभंग केलेला आढळून येतो. तसेच रामदासांनी चमत्कारालाच साधुत्व समजणाऱ्यांचा



समाचार घेतलेला दिसतो.

याप्रमाणे सामाजिक परिस्थितीनुसार संतांचे कार्य झालेले दिसून येते. पण त्यातही मुख्यतः हरिकीर्तनासाठी म्हणजे समाजाच्या पारमार्थिक उन्नतीसाठी जुने संत कायावाचामनाने झटले. त्यांची वाणी समाधिभाषेतील असल्यामुळे खेडोपाड्यात आजही गायली जाते. त्या अभंगांचा अभ्यास करता करता हृदयात भक्तीचा अंकुर फुटतो. त्यानेच पुढे ज्ञान वैराग्य मिळून शेवटी पराभक्ती देखील प्राप्त होते आणि साधकाचा सिद्ध होतो.

याप्रमाणे जुन्या संतवाङ्मयात भावभक्तीचा उद्घोष अधिक आहे. पण महारजांच्या वाङ्मयात भक्तीच्या सोबतच इतर आर्यशास्त्रांनाही सन्मानाची जागा मिळालेली आहे.

आपल्या महाराष्ट्रात आद्यकवी मुकुंदराजांपासून रामदास-तुकारामांपर्यंत मोठमोठे संत होऊन गेलेत. त्यांनी अभंगरचना केली व ग्रंथरूपाने समाजातील सर्व थरांच्या लोकांना मार्गदर्शन केले. त्या संतांची व्यक्तिमत्वे फार मोठी होती. त्यांच्या वाङ्मयातील स्फुट विचार अजून देखील सुशिक्षितापासून अशिक्षितांपर्यंत सर्वांना मार्गदर्शन करतात. बहुजन समाजातील भजनी मंडळे या विधानाची



साक्ष देतात. मुकुंदराज, ज्ञानेश्वरादि भावंडे, नामदेव, जनाबाई, गोराकुंभार, सावतांमाळी, चोखामेळा, एकनाथ, रामदास, तुकाराम, बहिणाबाई, निळोबाराय इ.समाजातील सर्व थरांशी एकरूप होऊन त्यांना समर्थपणेमार्गदर्शन करणारे संत सत्पुरुष होऊन गेले.

मात्र समर्थ रामदासानंतर अडीचशे वर्षाच्या कालावधीत अशा मोठ्या व्यक्तिमत्वाचे साहित्याची रचना करणारे संत झाले नाहीत. ह्याचा अर्थ असा नाही की, संत किंवा सत्पुरुष ह्या काळात झालेच नाहीत. झालेत परंतु त्यांची कार्यक्षेत्रमर्यादित असल्यामुळे त्यांचा प्रभाव एका विशिष्ठ क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला, आणि त्यांच्यामुळेच हिंदुसमाजाची शाश्वत जीवनमूल्ये सुरक्षित राहिलीत. या पार्श्वभूमीवर, श्रीगुलाबरावमहाराजांनी केलेले वाङ्मयीन कार्य पाहता, लुप्त होत चाललेली प्राचीन ऋषिपरंपरा विज्ञानयुगातही महाराजांच्या रूपाने पुन्हा सजीव झाली असेच म्हणावे लागेल.

आद्य शंकराचार्याप्रमाणे महाराजांनी अद्वैतविरोधी आणि भक्तिविरोधी असलेली सर्व मते खंडण केलीत आणि अद्वैतभक्तीचा सिद्धांत पुन्हा नव्याने प्रस्थापित



केला. परंतु खंडण केलेल्या मतवाद्यांचे संप्रदाय देखील परंपरेने वैदिकच असल्याचेही त्यांनी दाखवून दिले.आणि ''त्या त्या संप्रदायातील विरोधी भाग सोडूनदिला तर त्यांचा परस्पर समन्वय होवू शकतो.'' ही समन्वयदृष्टी त्यांनी आग्रहाने मांडली.

ब्रह्मसूत्र सांख्य योग भक्ती वगैरे शास्त्रांवर समन्वयपूर्वक आणि पांडित्यपूर्ण भाष्ये लिहीलीत.

प्राचीन महर्षीप्रमाणे सूत्ररचना केली.

आर्यशास्त्र आणि भौतिक विज्ञानावर लेखन केले.

भक्तिशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. अभंग, पदे, गीते यातून स्वतःच्या अंतःकरणातील भावमधुर ज्ञानोत्तरभक्ती प्रवाहित केली.

याप्रमाणे **प्राचीन ऋषिपरंपरा, प्राचीन आर्यपरंपरा, प्राचीन संतपरंपरा आणि प्राचीन शास्त्रपरंपरा महाराजांनी पुनरुज्जीवित केल्या,** असे निर्विवादपणे म्हणता येते.

महर्षी व्यासांच्या वाङ्मयीन कर्तृत्वात भिन्न भिन्न प्रकारचे नानाविध विषय आले आहेत त्याप्रमाणे महाराजांच्या साहित्यात देखील सांस्कृतिक विषयांवर

आणि अनेक शास्त्रांवर मूलभूत लेखन आले आहे. म्हणूनच समर्थ रामदासांनंतरच्या २५० वर्षांच्या कालावधीनंतर महाराजांच्या रूपाने बऱ्याच प्राचीन परंपरा पुन्हा सजीव झाल्या असेच म्हणावेसे वाटते.

### सांस्कृतिक आक्रमण

महाराजांच्या काळी इंग्रजी सत्ता दृढमूल झाली होती. इंग्रजांनी केलेले आक्रमण प्रथम राजकीय होते. पण सत्ता दृढमूल करण्यासाठी **लॉर्ड मेकॉलेने** अत्यंत दूरदर्शीपणाने सांस्कृतिक आक्रमणाचा पवित्रा घेतला. त्याने प्रथम जुन्या पारंपरेच्या संस्कृत पाठशाला बंद करविल्या आणि नव्या इंग्रजी शाळा-कॉलेजातून आधुनिक शिक्षणपद्धती सुरु केली. त्यामुळे हिंदुसमाज भाळला. पाश्चात्यांची भौतिक शास्त्रातील प्रगती पाहून स्तिमित झाला. हिंदुमनावरील संस्कार बदलू लागले. पूर्वी धर्म आणि भारतीय शास्त्रांविषयी असलेला आदर संस्कृत शिक्षणाच्या नवीन पद्धतीने नाहीसा करण्यात आला. असे हे इंग्रजी आक्रमण केवळ बाह्यच नव्हते तर त्याने हिंदूंची मानसिकताही काबीज केली. मुसलमानांप्रमाणे झिजिया कर लावला नाही परंतु गोडीगुलाबीने हिंदूंची मने वळविली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी



सेवेच्या मिषाने अशिक्षितांत व गिरीजनात ख्रिस्तीधर्माचा प्रसार केला.

गिरीजनांना ''नेटीव्ह म्हणजे आदिवासी'' हा भयानक शब्द वापरून इतर सर्व समाजाला आक्रमक आणि अत्याचारी ठरविले आणि एकात्म भारतीय समजमानसात परस्पर द्वेषाचे बीज न कळत पेरले. शहरातील लोकांना नोकरीच्या निमित्ताने इंग्रजी शिक्षण घ्यावयास लावले. इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारामुळे सुशिक्षितांची जीवनमूल्ये बदलली. आपला धर्म किंवा आपली पुरातन शास्त्रे टाकाऊ आहेत असे त्यांना वाटू लागले. त्यांच्याविषयी संशय निर्माण झाला. एम. ए. च्या विद्यार्थ्यांपासून प्राथमिक शाळेतील पोरापर्यंत प्रत्येकजणच धर्माच्या आवश्यकतेसंबंधी शंका काढू लागला. ''जुने सर्व टाकाऊ आणि नवीन सर्व संग्रह्य'' असा गैरसमज झपाट्याने पसरू लागला.

अशा भयावह परिस्थितीत इ. सन १८८१ मध्ये महाराजांच्या जन्म झाला. माधानसारख्या खेडेगावत देखील पाश्चात्य विचारसरणीला धरून भारतीय तत्त्वज्ञानाच्या सत्येतेसंबंधी प्रश्न विचारल्या जाऊं लागले. त्या सर्व प्रश्नांना महाराजांनी वयाच्या १४-१५ व्या वर्षापासून समर्पक



उत्तरे देण्यास सुरुवात केली. परंतु पुढे आपल्या वाणीचा प्रभाव दाखविण्यासाठी त्यांना खेडे सोडून अमरावती, नागपूर, रायपुर, हरदा, पुणे, मुंबई वगैरे ठिकाणी प्रवास केला. पाश्चात्य विचारसरणीला खोडून काढण्यासाठी ग्रंथरचना केली.

महाराजांच्या सभोवताल सुशिक्षित समाज अधिक होतात. पाश्चात्य विद्येने दिपून गेलेला श्रोतृवर्ग होता आणि पंडिती परंपरेतील विद्वान वर्गही होता. या सर्वांच्या मनात परमेश्वर, अध्यात्म व इतर भारतीय शास्त्रांसंबंधी आंग्लविद्येच्या शिक्षणामुळे एक प्रकारची अनास्था निर्माण झालेली होती. आपली प्राचीन परंपरा या भौतिक आणि वैचारिक आक्रमणापुढे कितपत टिकाव धरू शकेल, या संबंधीची मूलभूत शंका जनमानसात नुकतीच उदय पावली होती. आर्यसंस्कृतीच्या मूल्यांवरच प्रश्नांचा भडिमार सुरू झाला होता. अनपढापासून तो उच्चशिक्षितापर्यंत सर्वांच्याच मनात पाश्चात्याच्या भौतिक सुधारणांमुळे गोंधळ निर्माण झाला होता. हा गोंधळ शमविण्याचे कार्य आत्मानुभवी सत्पुरुषाशिवाय कोणी करणे शक्य नव्हते. पुस्तकी पांडित्याने किंवा केवळ मननात्मक विद्वत्तेने सशंयाचे समूळ उच्चाटन



होणे कधीच शक्य नसते. म्हणूनच महाराजांनी पाश्चात्यमतांच्या खंडनाप्रमाणेच प्राचीन आर्यशास्त्रांवरही नवीन मांडणी करून नवी ग्रंथरचना केली.

### महाराजांची जीवननिष्ठा

**''आर्यांचे म्हणणे योग्य आहे असे सिद्ध करणेहेच माझे व माझ्या हितचिंतकाचे जीवनकर्तव्य आहे.''**

असे महाराजांनी एका पत्रात उद्‌गार काढले आहेत. यावरून महाराजांची आर्यसंस्कृतीवरील आक्षेपांचा प्रतिकार करण्याची मूलभूत जीवननिष्ठा तीव्र शब्दात व्यक्त झाली आहे. ही महाराजांची मूळ भूमिका लक्षात घेतली असता त्यांनी निरनिराळ्या विषयांवर लिखाण कां केले, ते समजण्यासारखे आहे.

डार्विनचा उत्क्रांतिवाद, स्पेन्सरचा अज्ञेयवाद, अणुवाद, जडवाद, यांचे खंडन करून भारतीय सिद्धान्तच कसे योग्य आहेत, हे त्यांनी सहज सोप्या युक्तिवादाच्या साह्याने पटवून दिले.

आधुनिक मानसशास्त्राच्या अभ्यासाने भोग सुलभ करण्यापेक्षा ''योगातील मनोनिग्रह कसा उपयुक्त व अनुभवसिद्ध आहे'' हे तौलनिक रीतीने दाखवून दिले.

अलौकिक व्याख्यानमाला, साधुबोध, योगप्रभाव, समयोपदेश व पत्रे वगैरेतून आधुनिक पाश्चात्य विचारसरणींचे मूल्यमापन करून अभ्यासूंना योग्य दिशा दाखविली.

न्यायशास्त्रातील ''प्रत्यक्ष खंडाचा'' विस्तार करून वैशेषिक दर्शन या'' आर्यभौतिक शास्त्रातून'' नवीन भौतिक शोध कसेलावावेत, याचेही अभूतपूर्ण विवेचन केले आहे. असे करताना ''आपले ग्रंथ आधुनिक शास्त्रांचे मूळ कसे कायम राहतील'' यासंबंधीच्या उपयुक्त सूचना मार्मिक रीतीने दिल्या आहेत. ते म्हणतात -

**''ग्रंथरचना अशी करावी की पाश्चात्य आधुनिक शास्त्रे आपल्या ग्रंथांची भाषांतरे वाटली पाहिजेत.''**

या संबंधीचा विशेषविचार न्यायदर्शनाच्या विवेचनात आला आहे.

*प्रत्येक कलियुगात अवतरण*

स्वतःच्या जीवनकार्याविषयीची भूमिका संप्रदायसुरतरू, सुखवरसुधा, स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार, पत्रव्यवहार आणि अभंगादिकांतून मांडली आहे. श्रीनारद, व्यास, शंकराचार्य यांच्याप्रमाणेच -

**''मीही धर्माधिकारी म्हणून प्रत्येक कलियुगात**



**श्रीनारदार्यांच्या आज्ञेने येत असतो.''**

असे अगदी स्पष्ट शब्दात संप्रदायसुरतरूत सुरवातीलाच विशद केले आहे. संप्रदायनिर्मितीचे कारण व समन्वयविचाराची पद्धति सांगून सर्वच लोकांना त्यांच्या त्यांच्या धर्मप्रवृत्तींची योग्य दिशा दाखवून दिली, तसेच सांप्रदायिकांचे किंवा महाराजांच्या हितचिंतकांचे महाराजांविषयी काय कर्तव्य आहे तेही थोडक्या शब्दात स्पष्ट रीतीने मांडले.

*अवतरण-परंपरा*

* प्रत्येक कल्पाच्या सुरुवातीला ब्रह्मदेव उत्पन्न होऊन वेदांचे पुनः पुन्न संस्मरण करीत असतात.

* मन्वन्तराच्या सुरुवातीला मनू उत्पन्न होऊन स्मार्त कर्माचा उपदेश देतात.

* अपांतरतमऋषी वेद्माचार्य म्हणून येतात व सर्व जगतात लोकांच्या अधिकारानुसार निरनिराळ्या धर्मांची स्थापना करतात.

* व्यास पुराणकार म्हणून येतात व वेद्मे चार भाग करतात.

* शुकनारदादि व ज्ञानेश्वरतुकारामादि भक्त्याचार्य



म्हणून युगायुगात अवतार घेऊन लोकांच्या उद्धाराचा भक्तिमार्ग सांगतात.

* त्याचप्रमाणे श्रीगुलाबराव महाराज देखील भक्तीचे व धर्माचे आचार्य होऊन प्रत्येक कलियुगात अवतरत असतात. (संप्रदायसुरतरू अ. १-१२३ ते १२९)

**अपांतरतम वेदाचार्य । मन्वादि स्मृत्याचार्य ॥ व्यासशुकादि पुराणाचार्य । आगमाचार्य नारदादी ॥ शंकराचार्यादि धर्मस्थापक । तुकारामादि प्राकृताचार्य देख । कल्पी कल्पी तेचि होती ॥ तैसी प्रतिकालिमाझारी। मजही स्मृती धर्माधिकारी । होय येथे म्हणता निर्धारी । अविश्वास कां कीजे ॥ आम्ही बद्ध जंव आहो । तरी कल्पी कल्पी सर्वदा राहो । मग धर्मविचारही सांगणे होवो । हाचि लोकां युगी युगी ॥ आणि मुक्त मानिता आम्हांस कोणी । तेणे विश्वास ठेवावा आमुचे वचनी । कल्पी कल्पी अधिकारी होवोनी । येत आम्ही ॥**

श्रीतुकाराममहाराज ज्याप्रमाणे म्हणतात :-

**आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी ॥**
**बोलिले जे ऋषी । साचभावे वर्ताया ॥**

त्याचप्रमाणे महाराजही म्हणतात



**''मी पुनः पुनः कलीत जन्म घेत असतो. भगवान् नारदाचार्यरूप असलेल्या ज्ञानदेवांच्या मुखातून मिळलेल्या आज्ञेनुसार श्रीकृष्णभक्तीची स्थापना करण्याचा प्रयत्न मी करीत असतो.''**

याप्रमाणे भक्ती आणि धर्माच्या अधिकारिकत्वाची जाणीव स्पष्टरूपाने ठेवून महाराजांनी सर्व कार्य केले आहे. त्यामुळेच त्यांचेग्रंथ जुन्या आर्य संस्कृतीतील आर्य परंपरेतील असून नवीन युगालाही मार्गदर्शक आहेत असेच आढळते. शंकराचार्यांनी समन्वय करून भाष्यादी ग्रंथात अद्वैतसिद्धांताचे पुनः प्रवर्तन केले. त्याचप्रमाणे महाराजांनी वेद-पुराणे-स्मृती व संतांची वचने यांचा समन्वय करून भक्तीचे शास्त्रीयत्व व आर्यधर्माचे सर्वसमावेशकत्व सिद्ध केले. संप्रदायसुरतरूच्या २०व्या अध्यायात ते म्हणतात -

**''प्राचीन आर्यग्रंथाना अनुसरून जगातील सर्व धर्मांचा व आर्यधर्मातील सर्व अंगांचा समन्वयपूर्वक व अभीष्टतापूर्वक तातदत्तस्फूर्त्युक्त, किंवा ती संपूर्ण स्फूर्ती हृदयात साठवितां आली नसल्यास यथाशक्ती म्हणा, मी संपूर्ण विचार केला आहे.** मनुष्य नित्य चुकीला

पात्र आहे. श्रुतीविरूद्ध स्मृतीदेखील प्रमाण होऊ शकत नाही. तेथे माझे म्हणणे प्रमाणच झाले पाहिजे असे मी कोणत्या तोंडाने म्हणूं? पण- एहि पै करि है शंका । सो मोहिते अति जडमति रंका ।।'' तुलसीदास

*इतर शास्त्रांविषयी आदर*

महाराजांनी शांकर अद्वैतानुसार व भक्तिशास्त्रानुसार अनेक ठिकाणी निरनिराळ्या शास्त्रांचे खंडन केले आहे. तत्रस्थ खंडन जरी योग्य असले तरी महाराजांचे मनात त्या त्या शास्त्रांविषयी पूज्यबुद्धी कायम आहे. अनेक वेळी आपल्या मंडळीना शिक्षण देताना- विचारप्रवृत्त करण्यासाठी- न्याय, सांख्य वगैरे शास्त्रांवर त्यांनी आक्षेप घेतले आहेत. त्या आक्षेपांची उत्तरे तीच शास्त्रे पुन्न पुनः अभ्यासून त्यातूनच काढावीत, अशी त्यांची इच्छा असे. स्वतः काढलेल्या आक्षेपांची उत्तरे त्यांना माहीत असत. पण आपल्या मंडळींना शिक्षण देण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे. यासंबंधी त्यांचे एक वाक्य महत्वाचे आहे.

**''माझ्या सहज बोलण्यात आलेल्या एखाद्या शास्त्रावरील आक्षेपाने कोणत्याही शास्त्राविषयी उगीच अनादर करून घेऊ नये.''**



तत्त्वज्ञानाच्या आधुनिक पुस्तकांमध्ये भारतीय शास्त्रांविषयी अनेक आक्षेप घेतलेले दिसून येतात आणि त्यांचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्या त्या शास्त्रांविषयी अनादरही व्यक्त केलेला आढळून येतो आणि तो विद्यार्थ्यांना शिकविलाही जातो. अशा वैचारिक संभ्रमाच्या परिस्थितीत महाराजांची वरील भूमिका निश्चितच मार्गदर्शन करणारी आहे.

*इतर संप्रदायांविषयी आदर*

महाराजांनी जैन, महानुभाव वगैरे सर्व संप्रदायांचे प्रसंगोपात्त आपल्या प्रखर युक्तिवादाने खंडन केले आहे. परंतु त्यांच्या आवश्यकतेसंबंधीही त्यांचा निश्चय आहे. इतर वैदिक लोकांनी स्वधर्म सोडून त्या पंथांकडे जाऊ नये, येवढ्यासाठीच त्यांनी त्या त्या संप्रदायातील तत्त्वांचे खंडन केले. पण त्या त्या संप्रदायाच्या अनुयायांनी आपली श्रद्धा गमावू नये, असे महाराजांना वाटत असे ते म्हणतात -

''मानभावांचे मत परंपरेने वेदमूलकच आहे. मानभावांची तीन स्थळे व त्यावरील बंध मला येत आहेत हे खरे आहे. तथापि उपदेश घेतल्यावाचून लोकांना सांगनये, असा



त्यांचा निर्बंध असल्यामुळे लोकांपुढे त्या गोष्टी मी जाहीर करणार नाही.''

तसेच एकदा जैन पंडिताशी त्यांनी मोकळ्या मनाने चर्चा केली. जैनांचे तत्त्वज्ञान त्याला समजावून दिले. त्याचा श्रद्धानाश होऊ नये म्हणून महाराजांनी त्याचेशी वाद केला नाही.

याप्रमाणे इतर संप्रदायांचेही संकेत महाराज कटाक्षाने पाळत. यावरून त्यांचे ''मतभेदसहिष्णुत्व आणि सर्व धर्म अधिकारानुसार ईश्वरानेच निर्माण केले आहेत, या सिद्धान्तावरील दृढ निष्ठा'' स्पष्ट दिसून येते. इतर संप्रदाय व धर्मांविषयी ते हीनबुद्धी ठेवीत नसत येवढेच नव्हे तर त्यांच्या संकेतांचाही आदर करीत. अशी महाराजांची मतभेदसहिष्णुता स्वभाविक रीतीने व्यक्त होत असे.

*स्व-गुरुनिष्ठेचा आग्रह*

वर्ध्याचे श्रीधरबोवा परांजपे रामदासी यांचा महाराजांनी बिमोड केला तेव्हा त्यांचे शिष्य महाराजांकडे आले. परंतु महाराजांनी त्यांना स्वगुरुश्रीधरबोवा परांजपेंवरच दृढ निष्ठा ठेवण्याचा उपदेशकेला.



तसेच देवाससंस्थानेच राजे तुकोजीराव पवार यांना लिहिलेल्या पत्रात त्यांचे गुरु शीलनाथस्वामी यांचेवरच श्रद्धा ठेवून राहण्यास राजे तुकोजीरावांना सांगितले.

**शीलनाथस्वामी सोयरा सज्जन । तयांचे चरण आठवावे ।। करावा जतन आपुला विश्वास । काही आणिकांस स्मरूं नये ।।**

जेव्हां शिवाजी राजे संत तुकारामांना शरण गेले असता त्यांनी शिवाजींना समर्थ रामदासांवरच दृढश्रद्धा ठेवण्यास सांगितले.

विश्वामित्रांनी रामाला भगवान् वसिष्ठांकडूनच उपदेश देवविला. त्याप्रमाणे महाराजांची वृत्ती सर्वांना निस्पृह व योग्य मार्ग दाखविणारी होती. आणि हीच खरी भारतीय परंपरा होय.

*हितचिंतकांना आवाहन*

श्रीनिवासशास्त्रींना लिहिलेल्या पत्रात महाराजांनी स्वतःची जीवननिष्ठा व्यक्त केली आहे. स्वतःच्या ग्रंथाविषयी व सिद्धान्ताविषयी यथायोग्य जाणीव त्यांच्या पत्रातून जाणवते -

**''साधरणतः मूर्ख असलेला समाज तर माझे भाषणच समजूं शकत नाही.** इतकी प्रतिकूल परिस्थिती असूनही मी धैर्याने धर्मकार्य करीत आहे, हे कोणालाही नाकबूल करता यावयाचे नाही. आतां इतके लोक जरी आपल्या विरोधी आहेत तरी त्या सर्वांना आतून धर्मविश्वासाचे बळ नाही, हे मी निश्चयाने सांगून ठेवतो.''

पुढे त्याच पत्रात महाराजांनी आपल्या सभोवतालच्या मंडळींना साह्याची याचना केली आहे. ते साह्य दहा प्रकारांनी होऊ शकते —

**१** – कोणाचे नांव न घेता हिंदुधर्माला भलत्याच रीतीने वळण देणाऱ्यांवर सप्रमाण टीका करणे.

**२** – माझी मते योग्य आहेत याचा चांगला निदिध्यास करून ती लोकांना सांगणे.

**३** – आपल्याच्याने होईल तेवढ्या पारलौकिक अभ्यासाचा नियम करणे.

**४** – आपद्‌धर्म सांभाळण्यासाठी माझी मते समजावून घेऊन तसे वागणे पण त्यासोबत पारलौकिक धर्मावर विश्वास मात्र दृढ ठेवलाच पाहिजे.

**५** – मुख्य भगवद्‌भक्तीची स्थापना मधुराद्वैतानुसार



करणे.

**६** – माझे प्रासंगिक धोरण न समजल्यास निर्भीडपणे पण एकांतात तत्संबंधी विचारून त्याप्रमाणे करणे. धर्मसंस्थान्वयी कामे सर्व अशीच होत असतात.

**७** – ग्रंथ छापून प्रसिद्ध करणे.

**८** – हाताचे न होईल तर तोंडाचे करणे.

**९** – शाब्दिक अध्ययन कुठेही करावे. परंतु मला साह्य करण्यासाठी आर्ष सिद्धान्त माझ्याच शब्दातून समजून घ्यावा.''

हे सर्व सांगितल्यावर महाराज याचना करतात की-

''जे माझ्याहून लहान आहेत त्यांनी मला मुख्य समजून म्हणा व माझ्याहून जे वडील आहेत त्यांनी आपल्या पुत्राचा कृतीला अनुमोदन दिले पाहिजे असे समजून म्हणा, मला साह्य करावे, अशी मी याचना करतो.''

याप्रमाणे महाराजांची एकूण जीवननिष्ठा व्यक्त होत असून दुसऱ्या एका ठिकाणी तर आपल्या जीवनाचे राष्ट्रीय व सांस्कृतिक ध्येय जोरदार शब्दात त्यांनी मांडले आहे -



**१०–''आर्यांचे म्हणणे योग्य आहे,**
**हे सिद्ध करण्याशिवाय**
**मला व आपण प्रभृती माझ्या हितचिंतकांना**
**दुसरे कोणतेही काम नाही.**
**सांख्ययोगवेदान्त जे काही असेल**
**ते आमचे हेच !**

आणि इतर कामाची टाळाटाळी करणारा मीही या कामात कधीही टाळाटाळी करीत नाही. एवढाच माझ्या आयुष्यात नियमितपणा दिसत असेल. तेव्हा हे मी आपले काम बरोबर करीत आहे, असा माझ्यावर विश्वास ठेवून मला येवढे साह्य करावे.''

*संप्रदाय : निर्मिती व रक्षण*

श्रीज्ञानेश्वरमधुराद्वैतसंप्रदाय नांवाचा नवीन संप्रदाय निर्मिण्याचे कारण काय? या प्रश्नाला महाराजांनी मार्मिक उत्तर दिले आहे. — वेदान्तामध्ये आत्मानुभव घेण्याच्या अनंत प्रक्रिया आहेत. पण एका व्यक्तीला त्यातील एकच प्रक्रिया उपयोगी पडते पण अशा एका प्रक्रियेचा उपयोग होणाऱ्या अनेक व्यक्ती एकत्र आल्या किंवा परंपरेने तीच प्रक्रिया शिकूं लागल्या की आपोआप संप्रदाय तयार होतो.



असे एकच काय पण अनेक सप्रंदाय निघाले तरी काहीच नुकसान नाही, उलट चांगलेच आहे. उदा.- सर्व पृथ्वीवर राहतात, मग तू आपले घर वेगळे कशाला बांधलेस? या प्रश्नाच्या उत्तराप्रमाणेच येथेही उत्तर आहे.''

आपल्या सोईप्रमाणे म्हणजे अधिकारानुसार वेदान्तातील कोणतीही प्रक्रिया श्रीगुरुंनी निवडून दिली की त्यानुसार चालणे ही परमार्थातील दंडक आहे; यालाच संप्रदाय म्हणतात. पृथ्वी एकच पण घरे भिन्न भिन्न तसेच धर्म एकच पण संप्रदाय भिन्नभिन्न अशी स्थिती आहे.

महाराज स्वतःच्या या संप्रदायाच्या रक्षणाबद्दल अगदी निर्भय आहेत ते म्हणतात - ''या संप्रदायाचेरक्षक तात श्रीज्ञानेश्वर आणि श्रीकृष्ण आहेत म्हणून मी कोणावर रक्षणाची भिस्त घालीत नाही. ज्यांनी मला हा संप्रदाय दिला तेच त्याचे रक्षण करतील.''

उगीच कोणी कोणाला भलते शिकवूं नये, असा मजजवळ राहणाऱ्या व इतर सर्व महात्म्यांना हात जोडून वर मागतो.''

या महाराजांच्या म्हणण्याचा अर्थ एकच वाटतो. तो म्हणजे कोणी व्यक्ती असो किंवा नसो महाराजांचे ग्रंथ

हेच संप्रदायाचे नियामक आहेत. वैदिक परंपरा, भागवत संप्रदाय, वारकरी संप्रदाय या सर्वांना अनुक्रमे वेद - भागवत - ज्ञानेश्वरी या अजरामर ग्रंथांनीच अजरामर केले. त्याचप्रमाणे महाराजांचा संप्रदाय त्यांचे ग्रंथच पुढे चालवितील, असे समजून असावे.

### एकमेकांना सांभाळावे

या संप्रदायात गुरु व शिष्य या दोघांनीही एकमेकांना सांभाळून न्यावे पण संप्रदाय सोडू नये असा महाराजांनी अतिशय आग्रह धरला आहे ''मी परस्त्रीगामी झालो तर माझा निरोध करा पण संप्रदायावरील निष्ठा कमी होऊ देऊ नका. गोरक्षांनी मच्छिन्द्रनाथांना स्त्रीराज्यातून सोडवून आणले. त्याप्रमाणे मला दंड देऊन सन्मार्गावर आणा; आणि मीही सांप्रदायिक चुकल्यास त्याला दंड देईन व सन्मार्गावर आणीन; कारण श्रद्धानाश अत्यंत दुःखद व विपरीत पर्यवासी होत असतो.''

अशी ही संप्रदाय न सोडण्याची अत्यंत निश्चयात्मक दृढ भूमिका पाहून महाराजांच्या आत्मविश्वासाची थोडीफार कल्पना येते.



### मनाची कोमलता

अत्यंत तर्ककर्कश बुद्धी आणि अतिशय कोमल भावना यांचे मनोज्ञ मिश्रण महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटलेले आहे. ''लोण्याहूनी मऊ आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे'' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे खंडनमंडन करताना असलेला महाराजांच्या कठोर बुद्धीचा आक्रमक पवित्रा, ज्ञानेश्वर माउलीचे स्मरण होताच विरघळून जातो. आणि कोमल हृदयातली अदंभित्व आणि अमानित्वाची वृत्ती उचंबळून येते.- केव्हा मी पडीन एकटा धुळीत । मुखे आरोळीत नाम तुझे ॥ ज्ञानेश्वरमाये आळंदी वल्लभे । पिशी पिशी लोभे होई माझ्या ॥

या सर्व विवेचनावरून असे दिसून येईल की महाराजांच्या कार्यामागची प्रेरणा आगळीवेगळी आहे.

आम्ही वैकुंठवासी आलोयाचि कारणासी । बोलिले जे ऋषी, साच भावे वर्ताया ॥ ही श्रीतुकारामांची भूमिका किंवा - मी दोन्ही हात वर करून लोकांना त्याच्या उद्धाराचा मार्ग सांगत आहे पण कोणी लक्ष देत नाही. ही व्यासांची भूमिका एकाच मुशीतून ओतल्या गेल्या आहेत.



दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ॥हे माउलीचे हृद्गतच महाराजांच्या हृदयातील खरी प्रेरणा आहे. व्यासांनी जसे वेदांचे चार भाग केले, अठरा पुराणांची पुनर्रचना केली, उपदेश केला, पण त्या सर्वातील एकसूत्रता कुठे खंडली नाही त्याचप्रमाणे महाराजांनी सर्व संप्रदायांबद्दल आदर ठेवून निरनिराळ्या योग्यतेच्या व्यक्तींना निरनिराळा उपदेश केला पण यातील एकसूत्रता कुठे तुटू दिली नाही. त्यानुसारच महाराजांनी सर्व संप्रदायांबद्दल आदर ठेवून विचारांच्या निरनिराळ्या पातळीवरून इतर मतांचे कधी खंडन तर कधी मंडन केले. पण खंडन करातनाही त्यातील ग्राह्यांशाकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही.

समन्वयाच्या भक्कम आधारावर योग्य प्रसंगी योग्य व्यक्तीला त्याच्या त्याच्या उद्धाराचा मार्ग प्राचीन शास्त्रपंरपरेनुसार काढूनदेण्याची महाराजांची हातोटी चकित करून सोडणारी आहे. हे **प्रक्रियाप्रावीण्य** महाराजांच्या भूमिकेतील विशेष आहे. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करून महाराजांचे अवतारकार्य समजावून घेणे समयोचित राहील.

*- कृ. मा. घटाटे.*



**श्रीगुलाबरावमहाराजांचे योगदान**

*

## सर्वधर्मांचे मूलतत्व

सत्ववृद्धिर्भवेद् येन अन्य गुणद्वयघातिनी ॥
स हि धर्मो न चान्यःस्यादिति स्वमतनिर्णयः॥ (य.१६)

*

## समन्वयव्याख्या

१. एकाधिकरणक-
२. भिन्नवृत्तित्वे सति
३. संप्रदायविच्छेदरहितत्वे सति च
४. पूर्वानेकफलावष्टम्भानन्तरम्
५. एकफलजनकत्वम् - समन्वयलक्षणम् ॥ (य.७-पत्र२२)

*

शांकरवेदान्ते नवीना भक्तिसंकल्पना

## अनध्यस्तविवर्तव्याख्या

१ अभिन्ने सति
२ अपररूपत्वे सति,
३ भेदाभानपूर्वकम्
४ अधिष्ठानज्ञान-अनावरकत्वे सति च,
५ प्रीतिमात्रत्वात्
६ अधिष्ठानज्ञान-अनिवर्त्यम्
अनध्यस्तविवर्तलक्षणम् ॥ (निदिध्यासनप्रकाशः प्र.८.)

# श्रीगुलाबरावमहाराज

# परिचय



**'धर्मश्री'**

**सूर्यमुखी दत्तमंदिराजवळ, विद्यापीठ मार्ग, पुणे**

**प्रसाद-भेट**

## श्रीगुलाबराव महाराज : जीवन-आलेख

* श्री गुलाब गोंदुजी मोहोड / पाण्डुरंगनाथ / ज्ञानेश्वरकन्या.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ.शु.१०. अमरावतीजवळ लोणीटाकळीत जन्म.
* चवथ्या महिन्यात अंधत्व / अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ.स.१८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते जठारांना पत्र. त्यात –



* मानभाव, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा.
* स्त्रीगीते : झोपाळा व जात्यावरील लोकगीतांची रचना.
* पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन.
* हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* इ. स. १९०४ - * पूर्वजन्माचे संस्मरण - गुजरातेतील झिंजूवाडा येथील सत्पुरुष स्वामी बेचरानंद (इ.स.१७९५- १८८०)
* आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट.
* ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ-
* उपलब्ध प्रतीत नसलेली ज्ञानेश्वरीतील ओवी सांगितली.
* माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे,
* बालसवंगडी व पहिला शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी पुढील महायात्रेसाठी दिलेल्या सूचना.
* आळंदीवारीचा आरंभ.
* स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह.
* श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची नित्यपूजा.
* प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायणराव पंडितांची भेट.
* मुलगा-अनंत यांचा जन्म.
* ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणेंची भेट.
* इ. स. १९०७ - * नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.
* मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा.



* वैज्ञानिक जगदीशचंद्र बोसांचा ग्रंथांची समीक्षा.
* कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * योगप्रभाव, चित्तोपदेश व सद्वैजयंती इ. ग्रंथांची रचना.
* शिवाच्या नित्य पार्थिवपूजनाचा आरंभ.
* प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. ९०९ -
* अंतर्विज्ञानसंहिता या यासूत्रग्रंथाची रचना व त्यातील ९ सूत्रांवर अलौकिक ९ व्याख्याने. वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,
* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन.
* पुण्याच्या साहित्यसम्राट न. चिं. केळकरांशी भेट.
* इस.१९११ ते १३
विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत,
* देवासच्या श्रीमंत तुकोबाराजे पवारांन पत्रे व देवासभेट.
* संगीतकार पंभातखंडेशी पत्राचार / गानसोपानाची रचना.
* धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५- भाद्रपद शु. १२ वामनद्वादशी रोजी पुणे मुक्कामी, चाकण ऑइलमिलच्या परिसरातील वास्तूत, शेवटच्या क्षणीं देखील, स्वतःच्या अनुभवाचा दाखला देऊन, शास्त्रनिष्ठेचा नारायण पंडितांना उपदेश केला आणि सूर्योदयाचे समयीं ब्रह्मस्थानी प्रस्थान केले.

# कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड / पाण्डुरंगनाथ.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा निर्माण केली.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे, या आक्षेपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.



* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय. दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तौलनिक मीमांसा आणि मानसायुर्वेदाची निर्मिती
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतर / आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेद-पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळस्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.



* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा? याचे मार्गदर्शन.
* ''आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे,'' — या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन व या संदर्भात लो. टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* वृत्ति-स्फुरणाच्या प्रक्रियेतून सृष्टि-उत्पत्तीची नवीन मांडणी.
* 'प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता' हे आधुनिक संकेत संतसाहित्याला किंवा आर्ष वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.



* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र * नाटक * आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची नवीन प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत ग्रंथरचना.
* पत्रे - ११८.
* अभंग - २१५२,
* गेय पदे - २२४४, **हिंदी- ३०४ संस्कृत-४१**
* गीत - १२५०,
* श्लोक- १०००,
* ओव्या - २३०००,
* एकूण ग्रंथ- १३९ / **हिंदी- २ / संस्कृत- ४२ (३१+पत्र११)**
* एकूण पृष्ठे - ७०००.

........................................................................

कै.त्रिपुरवारकृत - **श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र** (रु.१५०)
कै. द.ग.खापरेकृत- **माधुर्य मधुकोश** : विषयसूचीं (रु.३००)
**१३०गंथांचा सारांश** (११८ पत्रांसहित) (रु.२०)
**चित्रकथा** (रु.२०)

# श्री गुलाबरावमहाराजांची वंशावळी

### मोढवंशीय क्षत्रिय कुलाचा म्हणजे माधानच्या ‘मोहोड’ वंशाचा

## हस्तलेख

‘‘गोत्र वचीष्ट.कुलदेवी दुर्गा.निशान लाल दर्यावी सूरवंसी.कैफीयत वनशावळी मोहले मकान गुनेरगड सुभे लखनर (लखनऊ) सरहद हिंदुस्थान.तख्त दिल्ली सन ८०५ फसली.मुळ पुरस बनाम उदेसिंग राने रजपुत याचा पुत्र नामे देवसिंगजी याचा पुत्र नामें मनसिंग याचा पुत्र नामें लालसिंग.याचे घोडे मुकरा ३०० हमरा बंदे बादशाह गाजी महमदशाह आलम बाहादुसुकरा तहनाती सुभे दख्खन बमुकाम अवरंगाबाद सरफराज बंदे बादशाह हुकम मुकरा तनखा १३९४१० टके मुकरा देहात मौजे मधान प्रगणे सीरजगांव सरकार गावेल सुभे वराड पायाघाट सन ९१२ फसली मुकदम तुब गवळी वलद मान गवळी वलद गवळी सरकार तनखा आदा न करदय.सबब वतन फरोक्त.मय काळी व पांढरी वगैरे मामुल खरीद करदय बनाम दुर्गाजी मोहोड (लालसिंगचा पुत्र).याचा पुत्र इरभानजी.याचा चंदाजी.याचा अभिमानजी.याचा दावजी.याचा पुत्र आवजी. याचे पुत्र २ बयाजी (व) हुरजी.

(पुढील शब्द फोटोंत आले नाहींत.ते फोटोच्या मूळ हस्तलेखावरून घेतले आहेत.)

* बयाजी - दत्ताजी - मानाजी

* हुरजी - नगाजी - भिवाजी व सुभाजी

वरील लेखावरून असें दिसतें की पांचशें वर्षोपूर्वी इ.स.१३९५ च्या सुमारास लखनऊच्या सुभ्यांत गुनेरगड येथें ‘‘उदेसिंग नांवाचे सूर्यवंशी वसिष्ठ गोत्री राणे रजपूत जातीचे एक गृहस्थ’’ रहात होते.त्यांच्या पासून चवथ्या पिढीला ‘‘लालसिंग’’ नांवाचे पुरुष झाले.हे लालसिंग दक्षिणेत महंमदशाह ब्राह्मणी (१४६३ ते १४८२) याच्या लष्करांत तीनशे घोडेस्वारांचे नायक होते.अवरंगाबाद हें त्यावेळीं यांच्या छावणींचें मुख्य ठिकाण होतें.पुढें, इ.स.१५०२ च्या सुमारास माधान येथील मुकदम नामें तुब गवळी हा सरकारी मुकरर [१] सारा देईनासा झाल्यामुळें माधानचें वतन फरोक्त झालें.ते लालसिंगाचा पुत्र नामें दुर्गाजी मोहोड यांनी खरीद केलें.हे दुर्गाजी मोहोड माधान येथील मोहोड घराण्याचें मूळ पुरुष व पहिले पाटील होत.यांचे पुत्र इरभानजी, त्यांचें चंदाजी.चंदाजीचे अभिमानजी, अभिमानजीचे पुत्र दावजी व दावजीचे पुत्रआवजी, आवजीचें पुत्रदोन - बाळाजी व हुरजी.यांच्याच वेळीं माधानचे दोन खेल (पाती / विभाग) झाले असावेत, असें वंशवृक्षावरून दिसते.हुरजीपासून ६ वे पुरुष सरणाजी नांवाचे झाले.सरणाजीचे पुत्र राणोजी.

राणोजीरावाला पुत्र चार.रघुजी, बकारामजी, नरसाभाऊ व गोंदुजी.रघुजीराव हे सर्वात वडील असून तीर्थरूपांच्या पश्चात तेच माधानचे पाटील झाले.

सर्वात धाकटे गोंदुजी.हे इ.स.१८९७ सालांत संपले.हे मोठे दानी, शिवभक्त व ब्राह्मणभक्त होते.यांच्या पहिल्या पत्नीचें नांव सौ. अलोकाबाई होते.ही लोणी टाकळी येथील पाटील विठोबा सवाई यांची कन्या.यांचे पुत्र

**श्री गुलाबराव महाराज उपाख्य पांडुरंगनाथमहाराज**

।

**श्री अनंतराव + श्रीमती लक्ष्मीबाई**

१) श्रीबाबुराव (मधुसूदन) + सौ.आशाबाई

।

राजाभाऊ, शरद, शाम, कु.कल्पना रा. साबळे

शैलेंद्र व गौरव

शंतनु, रधिका

(२) श्रीबाळासाहेब (प्रभाकर) + विजयाताई

।

श्री अजय, सौ.माधुरी रा.ठाकरे, कु.वर्षा.व रागिणी

# श्रीमहाराजांचे साहित्य विषयानुरूप सूची

अनुक्रम यष्टी

सूत्रगंथ

१. अन्तर्विज्ञानसंहिता (सं) य १६
२. ईश्वरदर्शनम् (सं) य १६
३. समसूत्री (सं) य १६
४. दुर्गातत्त्वम् (सं) य १६
५. काव्यसूत्रसंहिता (सं) य १६
६. शिशुबोधव्याकरणम् (सं) य १६
७. न्यायसूत्राणि (सं) य १६
८. एकादशीनिर्णयः (सं) य १६
९. पुराणमीमांसा (सं) य १६

आकर ग्रंथ

१०. संप्रदाय सुरतरु, (भा. १,२) य ११

भाष्यग्रंथ

११. नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला
संस्कृतभाष्यं च (सं) य १६
१२. ना.भक्तिसूत्रभाष्य ओवी ५५८ य १४
१३. प्रियलीलामहोत्सव १ (भागवतभाष्य)



आमंत्रणविलास य ३
१४. प्रियलीलामहोत्सव २ (भागवतभाष्य)
आगमनविलास य १४
१५. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः (सं) य १६
१६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः (सं) य १६
१७. ब्रह्मसूत्रव्याख्या य १५
१८. निगमान्तसुभा य १५
१९. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे य १८
२०. भगवद्गीतासंगति य १
२१. मनोहारिणी (हिन्दी) य १९
२२. गीत निरूपणे (शांताराम) य १७
२३. गीत प्रवचने (अन्नपूर्णाआईस) य १७
२४. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) य १५
२५. षट्पदध्वनिः य १५
२६. ईशावास्योपनिषद् य १५
२७. ऋग्वेदटिप्पणी (सं) य १६
२८. चौसष्टी (अमृ.अ१ वर) य १
२९. चिरंजीवपदाभ्यास य २(पू)
३०. बालवासिष्ठ (सं) य १६
३१. योगवासिष्ठ तत्त्व य १७
३२. योगवासिष्ठ निरूपणे
(मातोश्री रंगूताईस) य १८



शास्त्रग्रंथ

३३. सुखवरसुधा य १३
३४. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका य १३
३५. शास्त्रसमन्वयः (सं) य १६
३६. आगमदीपिका (सं) य १६
३७. युक्तितत्त्वानुशासनम् (सं) य १६
३८. प्रेमनिकुंज य १०
३९. शांतिसुधाकर य २पू
४०. वेदान्तप्रक्रियासमुच्चय य १५
४१. वेदान्तनिरूपण य १५
४२. तत्त्वबोधः (सं) य १६
४३. षड्दर्शनलेशसंग्रहः (सं) य १६

भक्तिग्रंथ

४४. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) य १
४५. निगमान्तपथसंदीपक य १
४६. भगवद्भक्तिसौरभ य २उ
४७. प्रीतिनर्तन य २उ
४८. नित्यतीर्थ य २पू
४९. प्रिय पाहुणेर य २पू
५०. भक्तितत्त्वविवेक (सं) य १६
५१. प्रियप्रेमोन्माद (सं) य १६



५२. गोपिकापादपीयूषलहरी य १५
५३. गोविन्दानन्दसुधा (सं) य २उ
५४. कान्तकान्तावाक्यपुष्पम् (सं) य१/य१६

योग ग्रंथ

५५. निदिध्यासनप्रकाश य १
५६. ध्यानयोगदिवाकर य २उ
५७. सोपानसिद्धि य २पू
५८. हिरण्ययोग (स्वप्नयोग) य १५
५९. योगांगयमलक्षण य १५
६०. योगप्रभाव (पद्य) य १५
६१. योगप्रभाव (गद्य) ४४ सूत्रे य २०
६२. ज्ञाने. कुंडलिनी निरूपण. य १५

सांख्य ग्रंथ

६३. सांख्यसुरेंद्र : कपिलसूत्रआोया य १४
६४.सांख्य सुरेन्द्र गद्य य १७
६५. सांख्यतत्त्व सूत्रविचार य १५
६६. सांख्यसार एक निबंध य १५
६७. सांख्यसार य १८ / य १४
६८. सांख्यकारिका निरूपण य १८

संगीत ग्रंथ

६९. छंद प्रदीप य १५
७०. गानसोपान य १५

<u>आयुर्वेद ग्रंथ</u>

७१. मानसायुर्वेद (सं) य १६

७२. मानसायुर्वेदावर दोन लेख य १५

७३. मिषगिंद्रशचीप्रभा (सं) य १६

७४. वैद्यवृंदावन य १८

७५. वैद्यनन्दिनी य १८

७६. भिषग्पाटवोपपत्तिः य १८

<u>प्रकरणग्रंथ</u>

७७. स्वमतनिर्णयः (सं) य १६

७८. संप्रदायकुसुममधु (सं) य १६

७९. सच्चिन्निर्णयः (सं) य १६

८०. चित्तोपदेश य २पू

८१. सद्वैजयंती (आर्या) य २पू

८२. बाराखडी य २पू

८३. त्रिकांडसार य २पू

८४. प्रमाद कल्लोळ य १५

<u>गाथा</u>

८५. अभंगांची गाथा (२१५७) य ९पू

८६. पदांची गाथा (२२४४पदे) य ९उ

<u>निबंध</u>

८७. अलौकिक प्रवास य २पू

८८. अमोघनिरूपण य २पू



८९. बौद्ध निबंध य १५

९०. वेदान्तनिरूपण य १५ / य १८

९१. सिद्धिसार य १५

९२. अलौकिक व्याख्यानमाला य ५

९३. युक्त्या य १८

९४. गुरुचरणकौमुदी य १८

९५. स्फुट निरूपण (नीळकंठ) य १८

<u>संवाद* व बोधवाक्ये</u>

९६. साधुबोध * य ८

९७. मणिमंजुषा य २उ

९८. सुवर्णकण य १८

९९. स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार * य ६

१००. दुर्मतहृदयभंजन * य १५

१०१. प्रश्नोत्तरे * य १५

१०२. वृत्तिक्षीरसागर य १५

१०३. बालबुद्धिविवर्धिनी * य १८

१०४. बोधवाक्ये य १८

<u>पत्रे ११४</u>

१०५ अकरा पत्रे य १

१०६. वीस पत्रे य २उ

१०७. सदतीस पत्रे य ७

१०८. चवरेचाळीस पत्रे य १२



१०९. एकपत्र (श्री खापरेंना) य १५

११०. एक पत्र (श्री कुर्याभाईना) य १८

<u>लोकगीते</u>

१११ स्त्रीगीते (५ अध्याय) य २/य ४

११२. स्त्रीगीतसंग्रह (१०९२ गीते) य ४

११३. तुंबडी य २पू

११४. रुक्मिणी स्वयंवर (लावणी) य९उ

११५. रुक्मिणीचे पत्र य ९उ

<u>स्तोत्रे</u>

११६. ज्ञाने-मातृपितृ-भावनाष्टक य २उ

११७. कृष्णपंचपदी य २पू

११८. गुरुपंचपदी य २उ

<u>चरित्र - आख्याने</u>

११९. आत्मचरित्र य १५

१२०. सूचना प्रकरण य १

१२१. सूचना प्रकरण य २उ

१२२. सूचना प्रकरण य ३

१२३. अभंगात्मक १९ आख्याने य ९पू

१२४. पदात्मक ७ आख्याने य ९उ

१२५. पतिव्रताचरितामृत य १५

<u>विविधरचना</u>

१२६. सुखपर्व (भारतावर नाटक)य १५



१२७. मात्रमृतपानम् (सं) य १६

१२८. पत्नीप्रेमपराग चरित्र / य२उ

१२९. नवी भाषा 'नावंग' य १५

१३०. ('') शब्दकोश य १५

१३१ ('') लिपी य १८

१३२. मोक्षपट (श्रौतक्रीडापट) य १८

१३३. हरिपाठाच्या प्रतिज्ञा य १८

१३४. हरिपाठाचा अर्थक्रम य १८

१३५. मायर्सवर टीपा य १८

१३६. शिक्षणरत्नाकर चरित्र / य १८

१३७. ज्ञानपाठ य ९पू.

१३८. गायत्री-अन्वयार्थ य १

१३९. स्व-समाजनियम य १८

---

**श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी**
**श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचे ग्रंथ**

१. आर्यधर्मोपपत्ति (रु.५०) २. हरिपाठ-रहस्य (रु.६०)

३. अमृतानुभवकौमुदी (रु.१५०) ४. ज्ञाने.गूढार्थदीपिका (३००)

५. अभंगगाथा (रु.५०) ६. विविध लेखसंग्रह (रु.१५०)

७. संतकथा (रु.१५) ८. पंचदशी प्रवचने

९. भागवत प्रवचने (रु.)

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.